CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : १९ सोमवार दि. ०२ मे २०२२ ते रविवार दि. ०८ मे २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## पाण्यावरून झालेला वाद काळ ठरला सावत्र भावाचा त्याने गळा चिरला

अहमदपूर/क्राईम रिपोर्टर



पाणी हे माणसाचे जीवन आहे हि वस्तुस्थिती आहे. पण निसर्गाने या पृथ्वीवर पाण्याचा भरपूर साठा उपलब्ध करून ठेवला आहे. तरी सुद्धा पाण्यावरून भांडणे होतात आणि ती इतकी विकोपाला जातात कि त्यातून माणूस एखाद्याचा जीव घ्यायला सुधा मागेपुढे पाहत नाही. अहमदपूर तालुक्यातील तळेगाव येथे राहणाऱ्या गणेश ससाणे याचे पाण्यावरून ...पान २ वर

## जन्मदाता नराधम बाप भलतेच करून बसला मुलीची अब्रु लुटून तो नरबळी देताना फसला

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

अंधश्रद्धा ही समाजासाठी घातक आहे. कारण याच अंधश्रद्धेमुळे काही भोंदू बाबा देवाचा धाक दाखवून लोकांचे शोषण करीत असतात. त्यामुळे शाम मानव, नरेंद्र दाभोलकर यांच्या सारख्या समाज सुधारकांनी आयुष्यभर अंधश्रद्धेच्या विरुद्ध आयुष्यभर लढा दिला आणि त्यांनी दिलेल्या लढ्यामुळेच सरकारला जादू टोना विरोधी कायदा करावा लागला. मात्र त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने अजूनही महाराष्ट्रासारख्या राज्यात भोंदू बाबांची दुकानदारी सुरु आहे. त्यातून नरबळी दिले जात आहेत. महिलांचे लैंगिक शोषण केले जात आहे. आणि यात कुटुंबातील पुरुष मंडळीच सहभागी असल्याने महिलांनी दाद तरी कोणाकडे मागायची. मात्र अशा गोष्टींबाबत बाहेर बोलण्याचा प्रयत्न केला, तर समाजात कुटुंबाच्या अब्रूचा पंचनामा होतो आणि त्याचे दुष्परिणाम शेवटी कुटुंबातील लेकी बाळीनाच भोगावे लागतात. यवतमाळ जिल्ह्यातील मदनी गावात असाच एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या ठिकाणी जन्मदात्या बापानेच पोटच्या पोरीचे लैंगिक शोषण केले आणि याबाबत कुठे वाच्यता केल्यास मुलीला आणि तिच्या आईला म्हणजेच त्याच्याब पत्नीला ठार मारण्याची धमकी दिली. हा नराधम तेवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने आपल्या मुलीचा गुप्तधनासाठी नरबळी देण्याचा प्रयत्न केला. पण याबाबतची माहिती त्या मुलीने तिच्या मित्राला एसएमएस पाठवून कळवली आणि त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तिचा जीव वाचवला. तसेच या प्रकरणी तिच्या बापासह ११ आरोपींना अटक केली. आता बाभूळगाव पोलीस या घटनेची चौकशी करीत आहेत. तर पोटच्या मुलीचे लैंगिक शोषण करून नंतर गुप्तधनासाठी तिचा बळी देण्याचा प्रयत्न करणाऱ्या या नराधम बापाला फासावर चढवा अशी गावकऱ्यांनी मागणी केली आहे.



स्वत:च्या मुलीशी शारिरीक संबंध ठेवणाऱ्या नराधम बापाने गुप्तधनासाठी लेकीचा नरबळी देण्याचा पयत्न केल्याची धक्कादायक घटना यवतमाळमध्ये घडलीय. यवतमाळच्या मादनी गावात हा संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारा प्रकार समोर आलाय. पीडित मुलगी ही १८ वर्षाची आहे. मुलीने सतर्कता दाखवत पोलिसांना या प्रकाराची माहिती दिली. पोलिसांनी वेळीच घटनास्थळी धाव घेत नरबळीचा प्रकार टाळला. पोलिसांनी दोन महिला आणि मांत्रिकासह ११ आरोपींविरोधात बाभूळगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलाय. पीडित मुलीसोबत नेमकं काय घडलं? पीडित मुलीने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, मी १३ वर्षाची असताना शाळेला सुट्ट्या लागल्या की यवतमाळमधून घरी येत होते. तेव्हा माझे वडील मला वाईट उद्देशानं कुठेही हात लावायचे. मी वडिलांच्या कृत्याबद्दल आईला सांगत होते. पण तेव्हा तुझे वडील तुझा लाड करत असतील असं आई मला सांगायची. मात्र, त्यांचे माझ्या अंगाला हात लावणे सुरुच होते. त्यानंतर मी एकदा सुट्टीवरुन घरी आल्यानंतर माझ्या वडिलांनी मी झोपेत असताना माझ्यावर लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर मला त्रास होत असल्याने मी आईला सांगितलं. मात्र, तेव्हा तिला वाटलं की मासिक पाळी येत असेल म्हणून दुखत असेल, त्यामुळे तीने दुर्लक्ष केलं. माझे वडील आईला खूप मारहाण करतात त्यामुळे ती त्यांना घाबरते. पुढे मी जेव्हा जेव्हा घरी यायचे तेव्हा वडील माझ्यासोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवत होते. मी त्यांना विरोध केला असता तुला, तुझ्या आईला आणि बहिणीला मारुन टाकेन, अशी धमकी त्यांनी दिली, असं पीडित मुलीने पोलीस तक्रारीत म्हटलंय.

इतकंच नाही तर २४ एप्रिल रोजी माझ्या वडिलांनी मला आणि बहिणीला बेदम मारहाण केली. मला बोलले की तुझ्यासारखी मुलगी जिवंत ठेवून काही उपयोग नाही. ...पान २ वर

## संसारातील भांडणांमुळे पतीचे डोके फिरले पत्नी आणि मुलाला निर्घुणपणे ठार मारले

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर





संताप हा खूप वाईट असतो. कारण संतापलेल्या माणसाच्या मनात नेहमी सुडाची भावना असते. त्यामुळे त्याच्या हातून काहीही घडू शकते. अशा माणसाला रागाच्या भरात रक्ताच्या नात्याची सुद्धा ओळख राहत नाही. गोधावणी येथे राहणाऱ्या वाहन चालकाचे असेच झाले. आर्थिक अडचणीमुळे त्याची पत्नी नेहमी त्याच्याशी भांडण करीत असे. त्यामुळे तो भयंकर चिडलेला होता आणि त्यातूनच त्याने पत्नी आणि मुलाला ठार मारले. या घटनेने लोक इतके संतापले कि त्यांनी आरोपीच्या भावाचे घर जाळून टाकले. तसेच आरोपीला तत्काळ फासावर लटकवा अशी मागणी केली आहे.





वयात आलेल्या अक्षदाचा विवाह तिचे वडील प्रकाश ज्ञानदेव बोरावके यांनी बलराम दत्तात्रय कुदळे या गोंधवणी येथील तरुणासोबत सन २०१५मध्ये लावून दिला होता. श्रीरामपूर तालुक्यातील गोंधवणी येथील रहिवासी असलेला बलराम हा खासगी वाहनावर चालक म्हणून कामाला जात असे. लग्नानंतर अक्षदा पढेगाव येथील तिचे माहेर सोडून सासरी राहण्यास आली. लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस अक्षदासाठी खुप चांगले गेले. लग्नानंतर तिच्या संसार वेलीवर एका पुत्ररत्नाचे आगमन झाले. त्यांनी त्याचे नाव शिवतेज असे ठेवले. दिघी निमगाव खैरी हद्दीत बलराम कुदळे हा पत्नी अक्षदा व मुलगा शिवतेज यांच्यासह रहात होता. खासगी वाहनावर चालक म्हणून काम करणारा बलराम हा वारंवार सुट्या घेऊ लागला. त्यामुळे घरात आर्थिक चणचण भासत असे. घरात आर्थिक ओढाताण होत असल्याने त्याची पत्नी अक्षदा त्याला नेहमी कामावर जाण्यासाठी सांगत असे. मात्र रागीट स्वभावाचा बलराम तिचे म्हणणे ऐकून न घेता उलट तिलाच शिवीगाळ करत मारहाण करायचा. कालांतराने बलराम व त्याचे वडील दत्तात्रय कुदळे यांच्यात वेळोवेळी भांडणे होण्यास सुरुवात झाली. ही गोष्ट बलरामने अक्षदाचे वडील प्रकाश यांना सांगितली. घरामध्ये नेहमी भांडणे होणे चांगले नाही. याचा विचार करुन अक्षदाचे वडील प्रकाश बोरावके यांनी हा विषय बलरामचे वडील दत्तात्रय कुदळे यांच्यासमोर मांडला. तुमची नेहमी भांडणे होतात, तर तुम्ही मुलगा बलराम व मुलगी अक्षदा यांना तुमच्या शेजारीच वेगळे राहू द्या. असे सांगितले. त्यानंतर बलराम आणि अक्षदा वेगळे राहू लागले. वेगळे राहिल्यानंतरही त्रास कमी झाला नाही. बलराम आता अक्षदाचा शारिरीक व मानसिक छळ करू ...पान २ वर

## लग्न जुळवून देणाऱ्याला जाब विचारायला गेला मध्यस्थाच्या कुटुंबाच्या हल्ल्यात नवरदेव मेला

सातारा/क्राईम रिपोर्टर



मयत विशाल

लग्न जुळवताना जो मध्यस्थ असतो त्याने दोन्हीकडची व्यवस्थित चौकशी करूनच लग्न जुळवायचे असते. कारण लग्नानंतर जर त्या दांपत्याचा संसार व्यवस्थित चालला नाही तर जो मध्यस्थ असतो त्याला दोष दिला जातो. वडी येथील विशालचे लग्न एका मध्यस्थाने त्याच्या भाचीशी जुळवून दिले. सुरवातीचे काही दिवस व्यवस्थित गेल्याने नंतर पती पत्नीत खटके उडू लागले. त्यामुळे विशालची पत्नी कायमची माहेरी गेली. मात्र याला मध्यस्थी असलेला पोपट येवले हा जबाबदार आहे असा विशालचा समज होता. कारण त्याची पत्नी हि पोपटची भाची होती. त्यामुळे तो भाचीची बाजू घेतो असा आरोप करून विशाल नेहमी पोपटच्या घरी जाऊन त्याच्याशी वाद घालू लागला. मात्र या नेहमीच्या भांडणाला कंटाळून पोपटच्या कुटुंबीयांनी एकेदिवशी विशालवर हल्ला करून त्याला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी चौघांना अटक केली आहे.

वडी येथील विशाल येवले याचा विवाह कराड तालुक्यातील वडगाव हवेली येथील प्रतिक्षा हिच्याशी चार वर्षापूर्वी झाला होता. प्रतिक्षा ही विशालचा काका पोपट येवले याच्या बहिणीची मुलगी होती. लग्नानंतर विशालचे आणि प्रतिक्षाचे चांगले ...पान २ वर

## अल्पवयीन मुलांना समजावणे जीवघेणे ठरले उपदेश करणाऱ्याला दगडाने ठेचून ठार मारले



मयत दिनेश





जळगाव/क्राईम रिपोर्टर

आजकाल आई-वडिलांचे मुलांकडे लक्ष नसल्याने तर कधी लाडावलेल्या मुलांना आई-वडील दम देत नसल्याने बाल वयातच मुलांची पावले चुकीच्या मार्गावर पडतात आणि त्यांना दारू तसेच जुगारासारखी वाईट व्यसने लागतात. मात्र अशा मुलांना कुणी समजुतीच्या चार गोष्टी शिकवण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना राग येतो. जळगावमध्ये अशाच एका घटनेत दोन अल्पवयीन मुले तलावाच्या परिसरात दारू पीत बसायची. एकेदिवशी तिथे पिण्यासाठी आलेल्या एका इसमाने या अल्पवयीन मुलांना दम दिला आणि चार गोष्टी सुनवून त्यातल्या एकाच्या कानाखाली मारली, तोच राग मनात ठेऊन काही तासातच या दोन मुलांनी त्या इसमाची दगडाने ठेचून हत्या केली. या घटनेने मोठी खळबळ माजली असून पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

आनंद सदाशिव माळी हा नुकताच तारुण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेला तरुण होता. वयाची नुकतीच विशी ओलांडलेल्या आनंदची मिशी अजून कोवळी होती. दुनियादारीचे फारसे ज्ञान नसलेला दहावीपर्यंत जेमतेम शिक्षण घेतलेल्या आनंदला मद्यपानाचे व्यसन जडले होते. अल्पवयातच मद्यपानाचे व्यसन जडलेल्या आनंदचा पंधरा वर्ष वयाचा एक बालमित्र ...पान २ वर

## मोबाईलवर जास्त बोलल्याने आला राग मित्राचा खून करून मैत्रीला लावला डाग



बदलापूर/सुनील तांबे

मोबाईल हा आता प्रत्येक माणसाचा सोबती बनला आहे. कारण बड्या उद्योगपती पासून रस्त्यावर कचरा गोळा करणाऱ्या माणसाकडेही आता मोबाईल दिसायला लागलाय. मात्र याच मोबाईलमुळे माणसावर कधी कधी जीव गमावण्याची पाळीही यायला लागलीय. कारण मोबाईलच्या वादातून आजवर अनेकांनी प्राण गमावले आहेत. बदलापुरमध्ये एक मित्र आपल्या मित्राच्या मोबाईलरून जास्त वेळ बोलला म्हणून मित्राने त्याची हत्या केली आणि हैद्राबादला पळून गेला. परंतु पोलिसांनी त्याला ७२ तासात अटक करून त्याच्यावर गुन्हा दाखल केला.

बदलापूरमध्ये एका तरुणाची डोक्यात दगड टाकून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना २५ एप्रिलला घडली होती. या निर्घृण हत्येचा धक्कादायक प्रकार पोलीस तपासात समोर ...पान ६ वर

## आईवरच्या रागाची तिच्या मुलाला शिक्षा दिली निष्पाप बालकाची त्याने गळा दाबून हत्या केली

उल्हासनगर/किरण तेलगोटे



प्रत्येक पुरुषाला इगो असतो आणि त्याचा हाच इगो दुखावला गेल्यावर तो मागचा पुढचा जराही विचार न करता सुडाने पेटतो. अशा वेळी त्याच्या हातून काहीही घडू शकते. उल्हासनगरमध्ये अशाच एका घटनेत एकाच कंपनीत काम करणाऱ्या एका महिलेचे तिथल्या पुरुष कर्मचाऱ्याशी किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. मात्र तिने या वादात आणखी दोन तीन बायका गोळा करून त्या इसमाला मारहाण केली होती आणि बायांकडून मार खाल्ल्यामुळे त्या इसमाचा इगो दुखावला होता. त्यानंतर त्या बाईवरचा राग त्याने तिच्या चार वर्षाच्या मुलावर काढला आणि त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



उल्हासनगरात चार वर्षीय मुलाचं अपहरण करून हत्या करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी उत्तर प्रदेशातून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. उल्हासनगरच्या कॅम्प २ मधील हनुमान नगर परिसरात २४ वर्षीय आरोपी कांचनसिंग पासी आणि मृत मुलाचं कुटुंब वास्तव्याला आहे. पीडित ...पान ६ वर

## पत्नीचा राग त्याने सासऱ्यावर काढला दारूच्या नशेत जावयाने मुडदा पाडला

अकोला/क्राईम रिपोर्टर



मयत गजानन

दारुड्या माणसाला कुणी किती जरी समजावण्याचा प्रयत्न केला तरी तो ऐकत नाही. कारण दारूची नशा एकदा का त्याच्या डोक्यात भिनली कि त्याचा स्वत:वर ताबा राहत नाही. अशावेळेस एखाद्यावर जर त्याचा राग असेल तर तो त्याचा जीव घ्यायला सुद्धा मागे पुढे पाहत नाही. उमरी येथे राहणाऱ्या निलेश धुरंदर याचीही अवस्था तशीच होती. दारूच्या नशेत तो पत्नीचा छळ करायचा. त्यामुळे पत्नी माहेरी निघून गेली. त्यानंतर तो पत्नीची समजूत काढायला सासरवाडीला गेला, पण सासऱ्याने आपल्या मुलीला नांदायला पाठवायला नकार देताच चिडलेल्या निलेशने रात्री झोपेत असलेल्या सासऱ्याला चाकूने भोसकून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी जावयाला अटक केली आहे.

पाथर्डी येथील गजानन पवार याची मुलगी शेवंती (काल्पनिक नांव) हिचा विवाह गेल्या चार वर्षापूर्वी उमरी येथील निलेश धुरंदर याच्याशी समाजाच्या रितीरिवाजा नुसार झाला होता. लग्नानंतर एक दोन वर्षातच शेवंतीला सासरहाट जाच सुरू झाला होता. त्यातच निलेश हा दारू पिऊन येवून तिला मारहाण करीत तुला जेवण करता येत नाही, तु काळीच आहेस, माझ्या आई वडिलांना...पान ६ वर

## बेरोजगार अभियंत्याची शोकांतिका झाली आईला ठार मारून स्वतः आत्महत्या केली

नागपूर/क्राईम रिपोर्टर

ज्या आईने ९ महिने पोटात वाढवले, त्याच आईच्या पोटावर एका नराधम मुलाने सपासप वर करून तिची जीवनयात्रा संपवली आणि नंतर स्वत:ही विष पिऊन आत्महत्या केली. अंगावर काटा आणणारी हि घटना नागपूर मधील धंतोली भागातील आहे. इंजिनियर असूनही २० वर्ष कामधंदा न करता बसून खात होता आणि शेवटी आईला ठार मारून त्याने स्वत:चेही जीवन संपवले. आता हे सर्व नेमक कशामुळे घडले याची पोलीस चौकशी करीत आहेत.



जन्मदात्या मुलाने आपल्या आईचा चाकूने वारकरून खून केला त्यानंतर स्वतः विष प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नागपूर शहरातील हिंदुस्तान कॉलनीमध्ये घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. श्रीनिवास चोपडे (वय ५१) असे मुलाचे नाव असून लीला विष्णू चोपडे (वय ७५) असे त्याच्या आईचे नाव आहे. नागपुरातील हिंदुस्तान कॉलनीमध्ये असलेल्या घरात श्रीनिवास आपल्या आईसोबत राहत होता. श्रीनिवास हा इंजिनिअर असून त्याने लग्न केलेले नव्हते, तो नोकरी सुद्धा करत नव्हता. इतक्या मोठ्या घरात दोघेच मायलेक राहत होते. गेल्या तीन-चार दिवसांपासून त्यांचा संपर्क होत नसल्यामुळे आणि मोबाईल बंद असल्यामुळे नातेवाईकांनी घरी धाव घेतली, सर्व बाजूंनी आत मधून कुलूप लागलेले असल्यामुळे ...पान ६ वर

CMYK

02 TO 08 MAY 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 30/04/2022 8:34 PM Page 1



पान १ वरून....

## पाण्यावरून झालेला वाद काळ...

त्याच्या सावत्र भावाच्या पत्नीशी जयश्री हिच्याशी जोरदार भांडण झाले होते. त्यानंतर संध्याकाळी जयश्रीचा पती नितीन कामावरून घरी येताच जयश्रीने घडलेला प्रकार पतीला सांगून त्याचे सावत्र दिराच्या विरुद्ध कान फुंकले. त्यामुळे नितीन चिडला आणि रागारागाने सावत्र भावाकडे जाब विचारायला गेला. यावेळी नितीन आणि गणेश यांच्यात जोरदार भांडण झाले. त्यामुळे चिडलेल्या गणेशने आपल्याकडच्या चाकूने आपला सावत्र भाऊ नितीनच्या गळ्यावर वार केले. यात गंभीर जखमी झालेल्या नितीनला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी जयश्रीच्या फिर्यादीवरून गणेश ससाणे याला आणि त्याच्या वडिलांना पोलिसांनी अटक केली आहे.

## जन्मदाता नराधम बाप भलतेच...

त्यानंतर २५ एप्रिल रोजी माझ्या वडिलांचं कणाशी तरी फोनवर गुप्तधनाबाबत बोलणं सुरु होतं. त्यानंतर संध्याकाळी ७ वाजता वडिलांनी मला अंघोळ करुन तयार होण्यास सांगितले. त्यांनी आमची मागची खोली साफ केली. त्यानंतर रात्री ९ वाजता आमचा एक शेजारी, शेतात काम करणारा व्यक्ती आणि अजून ४ पुरुष आणि दोन महिला त्याठिकाणी आल्या. ते सर्वजण आणि माझे वडील आमच्या घराच्या मागच्या खोलीत गेले. तेव्हा मी, माझी आणि बहीण आम्ही बाजूच्या रुममध्ये थांबून होतो. तेव्हा माझ्या वडिलांनी दरवाजा लावायला सांगितला आणि तु बाहेर जायचं नाही, तुझं इथं काम आहे, असं मला सांगितलं. त्यानंतर त्यांची चर्चा सुरु असताना एकजण म्हणाला की गुप्तधनासाठी एकाचा बळी गरजेचा आहे. तेव्हा माझे वडील मी माझ्या मोठ्या मुलीचा बळी देण्यास तयार असल्याचं म्हणाले. तसंच ते वारंवार वाल्मिक बाबा अशा नावाने मांत्रिकाला हाका मारत होते. त्यांच्या बोलण्यातून ते सर्वजण राळेगावातून आल्याचं मला समजलं.

माझ्या वडिलांनी आम्हा तिघींच्या हाती एक एक लिंबू दिला आणि पुन्हा त्या खोलीत परत गेले. तेव्हा मी लपून बघत होते. दोन महिलांच्या हाताने जागेची पूजा करुन बाकी जण एक मोठा खड्डा खोदू लागले. तेव्हा मला भीती वाटली. मी माझ्या मोबाईलमध्ये खड्ड्याचा फोटो काढला आणि यवतमाळच्या माझ्या मित्राला पाठवला. तसंच माझा बळी जाण्याची शक्यता आहे, मला वाचव, असा मेसेज त्याला केला. हा मेसेज वडिलांनी वाचू नये म्हणून तो डिलीटही केला. त्यानंतर माझ्या वडिलांनी जबरदस्तीने मला त्या खोलीत नेले. तिथे सर्वांनी माझी पूजा केली. माझ्या गळ्यात हार घालण्यात आला. तेवढ्यात पोलिस दाखल झाल्यामुळे माझा जीव वाचला असं पीडित तरुणीने आपल्या तक्रारीत म्हटलंय.

## संसारातील भांडणांमुळे पतीचे ...

लागला. तरी ती आपला नवरा आज ना उद्या सुधारेल या आशेवर तग धरून होती, पण त्रास काही कमी झाला नाही. शेवटी हा त्रास असहा झाल्यानंतर अक्षदाने दोन वर्षापूर्वी श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्यावेळी तिची नणंद सुरेखा दिनू रासवे (रा. अहमदनगर) हिने मध्यस्थी केली आणि तिला नांदण्यासाठी घरी घेवून गेली होती. सहा महिन्यांपूर्वी त्यांना निमगाव खैरी शिवारात असलेल्या गट नंबर ९४६ मध्ये रहाण्यासाठी पाठवले होते. अक्षदाच्या माहेरी बोरावके कुटुंबीयांना वाटले होते की वेगळे झाल्यानंतर तरी अक्षदाचा संसार सुखाचा होईल. मात्र काही दिवसांतच त्यांची ती आशा फोल ठरली. रविवार दि. १० एप्रिल रोजी श्रीरामनवमी होती. श्रीरामपूर शहरात हा सण उत्साहात साजरा केला जातो. येथे त्यानिमित्त यात्राही भरते. याचदिवशी सकाळी १०.२० वाजता अक्षदा हिच्या मोबाईलवरील व्हॉटसअपवरून बलरामने आपली पत्नी अदा आणि मुलगा शिवतेज यांचा खून केल्याचे फोटो प्रकाश साई सेवा व्हॉटस्अॅप ग्रुपवर पाठवले होते. हे फोटो प्रकाश बोरावके यांचा चाकण देथील मुलगा म्हणजेच असदाचा भाऊ महेश याने पाहिले, एवढेच नव्हे तर महेशला फोन करूनही बलरामने खून केल्याची माहिती दिली. ते धक्कादायक फोटो पाहून महेश चक्रावून गेला. त्याने राहुरी तालुक्यातील दवणगाव येथे रहाणारे त्यांचे मामा संजय गिरमे यांना ही हकीकत खरी आहे हे पहाण्यास घटनास्थळी जाण्यास सांगितले. दरम्यान बलरामने आपल्या गावच्या पोलीस पाटीलांना घटनास्थळी बोलावून घेतले. त्यांना त्याने याबाबत फिर्याद देण्यास सांगितले. स्वत: आरोपीच फिर्याद देण्यास सांगतो हे ऐकून पोलीस पाटील चक्रावून गेले. आपले कर्तव्य विसरून तेथून त्यांनी काढता पाय घेतला, कारण त्यादिवशी बलरामने एक खेळ खेळला होता, जो कोणाच्याही काळजाचा थरकाप उडवणारा होता. दि. १० एप्रिल २०२२ रोजी सकाळी बलराम व अक्षदा यांच्यामध्ये कामावरून वाद झाला, बलरामने नायलॉन अन् सुताची दोरी हातात घेतली आणि घरातून बाहेर पडला. बाहेर पडताना त्याने मुलगा शिवतेज याला खेळवत खेळवत शेतात आणले. तो अजाण मुलगा बापाबरोबर दंगा-मस्ती करत, हसत चालला होता. त्याला माहित नव्हते की आपला बापच आपला काळ बनला आहे. शेतात आल्यानंतर बलरामने खेळत-खेळत छोट्या शिवतेजच्या गळ्याभोवती फास आवळला आणि दोरीच्या सहाय्याने फास लावून पोटच्या मुलाला त्याने आंबाच्या झाडाला लटकावून दिले. आपल्या लहान मुलाला फासावर लटकवून तो क्रूर बाप निर्दयीपणे त्याच्याकडे पहात होता. तो कोवळा जीव हात-पाय झाडत होता. पण त्या निर्दयी बापाच्या काळजाला पाझर फुटला नाही. मुलगा तडफडून मरेपर्यंत तो त्याच्याकडे बघत राहिला. मुलाची हालचाल थंड झाल्यावर बलराम तेथून हलला. त्याची पावले घराच्या दिशेने पडू लागली.

त्यावेळी अक्षदा घरातच काम करत होती. तिलाही तिच्या मृत्यूची चाहुल लागली नव्हती. शिवतेजला ठार मारणारा बलराम अक्षदाकडे आला आणि तिला म्हणाला, चल, शिवतेज लपून बसला आहे, त्याला शोधू.' तिलाही माहिती नव्हते की आपला काळ जवळ आला आहे म्हणून ती त्याच्यासमवेत निघाली. ती बलरामच्या पुढे होती आणि तिचा काळरूपी नवरा तिच्या मागोमाग होता. ती बेसावध होती. त्याचाच फायदा घेत त्याने कुदळ उचलून तिच्या डोक्यात घातली. वर्मी घाव बसताच क्षणात ती गतप्राण होऊन कोसळली. तिने जीवाच्या आकांताने फोडलेल्या किंकाळीचा आवाज ऐकून वस्तीवरील माणसे पळत येवू लागली. पण समोरचे दृश्य पाहून सगळ्यांचे पाय थबकले. रक्ताच्या थारोळ्यात अक्षदा पडली होती. तिच्याजवळच तिचा क्रूर पती हातात कुदळ घेऊन उभा होता. हे पाहून लोकांमध्ये घबराट पसरली. कोणीतरी याची माहिती श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दिली. पण हे क्षेत्र श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याअंतर्गत येत असल्याचे सांगितले. त्यानुसार तेथे फोन लावण्यात आला. श्रीरामनवमीनिमित्त पोलीस बंदोबस्त होता, तेव्हा ठाणे अंमलदारांनी या घटनेची माहिती पोलीस निरीक्षक मच्छिंद्र खाडे यांना दिली. त्यांच्या आदेशावरून पोलीस उपनिरीक्षक अतुल बोरसे, संजय निकम, कॉन्स्टेबल संतोष कराळे यांचे पथक निमगाव खैरी हद्दीत असलेल्या शिवारात पोहोचले. घटनास्थळी दोन्ही मृतदेहाचे निरीक्षण करून पोलीस निरीक्षक मच्छिंद्र खाडे यांना कळवण्यात आले. त्यांनी याची माहिती डी. वाय.एस.पी संदीप मिटके यांना दिली. काही वेळातच वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह पोलीस पथक घटनास्थळी आले. मृतदेहांचे फोटो काढून पंचनामे केले. त्यानंतर मृतदेह रूग्णालयात रवाना केले. अक्षदाचे वडील प्रकाश बोरावके रा. पढेगाव, ता. श्रीरामपूर यांनी आपल्या मुलीच्या व नातवाच्या खून प्रकरणी फिर्याद दिली. पोलिसांनी बलराम दत्तात्रय कुदळे (वय ४०) याच्याविरुद्ध गुन्हा रजि. नं. ०१११/२०२२ मा.दं.वि. कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंदवला. इतकेच नव्हे तर त्याचे वडील दत्तात्रय गुलाब कुदळे, भाऊ जीवन दत्तात्रय कुदळे, भावजय सुजाता जीवन कुदळे, बहीण सुरेखा दिनू रासव (रा. अहमदनगर) यांच्याविरुद्धही कौटुंबीक हिंसाचाराचा ४९८ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. बलरामने बायको आणि मुलाचा अतिशय निर्दयीपणे खून केल्याने अक्षदाच्या माहेरचे नातेवाईक संतापले होते. त्यांनी बलरामचा भाऊ जीवन कुदळे याचे गोंधवणी येथील रहाते घर पेटूबन देवून आपला मोर्चा दिघी येथील घराकडे वळला. या घराचे मोठे नुकसान झाले. माहेरच्या नातेवाईकांनी-अक्षदा व शिवतेज यांचा अंत्यविधी घरासमोरच करण्याचे ठरवले होते. मात्र डी. वाय. एस. पी. संदीप मिटके, पोलीस निरीक्षक मच्छिंद्र खाडे यांनी त्यांची समजूत घालून त्यांना परावृत्त केले. पत्नी व मुलाचा निर्घृण खून करणाऱ्या बलराम याला पोलिसांनी घटनास्थळावरून ताब्यात घेतले. त्याला अटक करून श्रीरामपूर न्यायालयात हजर केले असता न्यायाधीशांनी सहा दिवसांची दि. १६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी ठोठावली, या भीषण खुनाच्या घटनेचा तपास डी. वाय.एस.पी. संदीप मिटके, पोलीस निरीक्षक मच्छिंद्र खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अतुल बोरसे करत आहेत.

## लग्न जुळवून देणाऱ्याला जाब विचारायला...

चालले होते. पण नव्या नवलाईचे दिवस सरल्यावर त्या दोघा नवरा बायकोत काही कारणातून कुरबुरी सुरू झाल्या होत्या. विशालच्या घरचे लोक म्हणजे आई वडिल तिला पटवून घेत नव्हते. त्यातून त्याच्या कुंटूबात कौटुबिंक कलह निर्माण व्हायला वेळ लागला नाही. दररोज सततची भांडणे याला विशाल ही वैतागलेला होता. विशाल याचे लग्न त्याच्या चुलत चुलता याने पुढे होऊन केल्याने व ती त्याच्या बहिणीची मुलगी असल्याने या भांडणात तो कधी कधी मध्यस्थी करीत होता. खरे तर विशालची आणि त्याची भावकी एकच होती. भावकीतील वादात पोपट येवले हे भाची प्रतिक्षा हिची बाजू घेवून विशाल याला बोलत होते. नवरा बायकोचा वाद हा फार पुढे गेला होता. त्यातून प्रतिक्षा ही विशाल बरोबर नांदायला तयार नव्हती. त्याचे बरोबर संसार करायला तिला नको झाले होते. दररोजच्या भांडणाने आता वेगळे वळण घेतले होते.त्यातून ती आपल्या माहरी निघून गेली होती. हा वाद इतका चिघळला होता की विशाल आणि त्याचे घरचे लोक हे पोपट येवले बरोबर भांडायला जात होते. तुम्ही आतील म्हणून तुम्ही सांगीतले म्हणून आम्ही लग्नाला तयार झालो. तिला नीट स्वयंपाक करता येत नाही अशी सगळी कारणे सांगून पोपट येवले याला नको नको ते बोलत होते. पोपट येवले याला विशाल आणि त्याचे घरचे लोक बोलत असताना पोपटची बायको वंदना येवले या पोपट याची बाजू घेवून बोलत होत्या. वादाने वाद वाढत च जात होता. त्यातच प्रतिक्षा ही विशालबरोबर नांदायला तयार नसल्याने विशालचे डोके सटकले होते. तो अधून मधून पोपट याच्या घरी जावून विनाकारण वाद उकरून काढत होता. याचा राग पोपट बरोबर त्याचा भाऊ मनोज येवले, वंदना येवले, मनोजची बायको वैशाली यांना येत होता. लग्न लावून देण्याचे काम आम्ही केले, तुला सरळ मुलगीला नांदावता येते की नाही म्हणून ते त्याचेबरोबर भांडण काढत होते. गेले क्रित्येक महिने हा वाद पेटला होता. त्यातच प्रतिक्षा आणि तिच्या आई वडिलांनी विशाल आणि त्याच्या कुंटूबा विरूध्द कोर्टाची पायरी चढण्याची ही तयारी दाखविली होती. त्यामुळे आपला संसार विस्कटायला पोपट येवले हेच जबाबदार आहेत असा समज विशाल याने करून घेतला होता. त्यातच त्याने माझे जर प्रकरण मिटविले नाही तर मी तुम्हाला बघून घेतो अशी धमकी ही या पुर्वी त्याने पोपट येवले यांना दिली होती.लग्न लावूद दयायचे ते दयाचे आणि वरती आम्हाला बघून घेण्याची धमकी विशाल देतो म्हणजे काय? म्हणून पोपट येवले त्याचा भाऊ मनोज येवले त्याच्या बायका वंदना आणि वैशाली हे सगळेच त्याचेवर चिडून होते. कधी एकदा विशालला आपण सरळ मार्गी आणतो याचा ते विचार करीत होते. प्रतिक्षा ही त्याचे काही एक ऐकत नव्हती. पोपट येवले हे काही तरी करून प्रकरण मिटविण्याच्या नादात होते. म्हणून त्यांनी आपली बहिण म्हणजे प्रतिक्षाची आई आणि भावोजीना ही समजावून सांगून प्रतिक्षाला नांदायला पाठवून दया अशी विंनती केली होती. त्यावेळी प्रतिक्षाने विशालच्या त्रासाचा पाढाच त्याचेसमोर वाचला होता. त्यातून आपल्या भाचीला कसा आणि किती त्रास होत आहे हे पोपट येवले यांनी ओळखले होते. त्यामुळे ते आता विशालच्या धमकीला घाबरत नव्हते. ते त्याला ही म्हणाले की बघ बाबा आम्ही तुझ्या बायकोला नांदायला चल म्हणून सांगितले पण तिने नकार दिला त्याला आम्ही तरी काय करणार असे ते विशालला म्हणाले त्यावेळी विशालने ही प्रतिक्षाची कशी चुक आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला.परंतु पोपट येवले यांनी आपली बाजू लावून धरल्याने त्याचे काही चालले नाही. याचा डाव कधी तरी दुसऱ्या वेळेस काढतो असे तो सरळ सरळ पोपट येवले यांना म्हणाला. पोपट येवले यांनी विशालबरोबर झालेला वाद आपल्या घरी बायको वंदना आणि मुलगा करण यांना सांगितला.तसेच आपला भाऊ मनोज आणि त्याची बायको वैशाली यांना ही सांगितला. त्यावर त्यांनी विचार करून आता विशाललाच चांगली अद्दल घडवायची असा निर्णय घेतला. बुधवार दि.२७ एप्रिल २०२२ रोजी वडी येथे या कारणातून रात्री ८ वाजणेच्या सुमारास पोपट येवले आणि विशाल येवले याच्यात वाद सुरू झाला. या वादात पोपटची बायको वंदना,मुलगा करण, पोपटचा भाऊ मनोज त्याची बायको वैशाली हे सगळेजण तयारीनिशीच सामील झाले होते. बघता बघता हा वाद इरेला पेटला गेला होता. पोपट आणि त्याचा भाऊ मनोज हे दोघे जण विशालला तुझी बायको तुला सांभाळता येत नाही आणि दोष आम्हाला देतो म्हणून त्याला मारहाण करू लागले. त्यात त्या दोघांच्या बायकांनी ही कुठून तरी काठी आणली आणि त्या काठीने विशालच्या डोक्यात जोरात मारहाण केली तो रक्तबंबाळ होऊन खाली पडला असता त्याला सोडवायला ही कुणी जवळ येत नव्हते. त्यातच पोपट याचा मुलगा करण याने चाकूने विशालच्या पोटात जोरात वार केले. त्यासरशी रक्त स्त्राव होऊन विशाल हा जागीच कोसळला. तशातच मनोज येवले याने लोखंडी गजाने त्याचेवर पुन्हा वार केले. त्या सरशी तो गंभीर जबर जखमी झाला होता. तो गंभीर अवस्थेत जागेवर पडल्यावर पोपट येवले आणि त्याचा भाऊ मोहन येवले हे सगळेजण घटनास्थळा वरून पळून गेले. बघ्या पैकी काही लोकांनी या घटनेनंतर जखमी अवस्थेतील विशाल याला उपचारासाठी गावातील एका खाजगी दवाखान्यामध्ये नेले. परंतु त्याची गंभीर अवस्था बघून तेथील डॉक्टरांनी त्याला पुढील उपचारासाठी कऱ्हाड येथील सरकारी दवाखान्यात नेले तेथील डॉक्टरांनी त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. या घटनेची माहिती औंध पोलीसांना मिळाल्यानंतर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी घटनेचा तपास चालविला होता. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.निलेश देशमुख पोलीस अधिकारी वैशाली पालेकर, स.पोनि प्रशांत बधे, पोलीस उपनिरीक्षक गंगाप्रसाद केंद्रे हे ही दाखल होऊन त्यांनी या घटनेची माहिती घेवून तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना केल्या होत्या. ही घटना कुणी व कोणत्या कारणातून केली आहे याची जवळपास माहिती पोलीसांना मिळाली होती.हल्लेखोर हे मयताच्या नात्यातील असल्याने ते जरी घटनास्थाळावरून पळून गेले असले तरी ते गावातच होते. याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी त्याची धरपकड केली होती. या घटनेतील संशयीत आरोपी पोपट येवले त्याची बायको वंदना येवले, मनोज येवले त्याची बायको वैशाली येवले यांना पोलीसानी ताब्यात घेतले होते.तर या घटनेतील पोपट याचा मुलगा करण येवले हा पळून गेला असल्याने त्याचा शोध पोलीस घेत होते. या घटनेची लेखी फिर्याद कृष्णाबाई दादासो येवले यांनी औंध पोलीसात दाखल केल्याने पोलीसांनी विशाल आण्णासो येवले (वय २४) याच्या खून प्रकरणी पोपट मोहन येवले (वय ४५) त्याची बायको वंदना येवले (वय ३६) मनोज मोहन येवले (वय ३५) त्याची बायको वैशाली येवले (वय ३०) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल केला त्याना मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली चाकू, काठी व लोंखडी गज जप्त केले. या घटनेचा पुढील तपास औंध पोलीस स्टेशनचे पो.निरी प्रशांत बघे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी प्रशांत पाटील कुंडलिक कटरे, सरतापे,महेश जाधव हे करीत आहेत. कौटुबिक वाद हा वेळीच मिटविला गेला नाही तर तो अधिकच चिघळतो आणि त्यातून खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते. खरे तर हा वाद विशाल याच्या घरातील होता. त्याची बायको नांदायला येत नाही यात पोपट येवले आणि त्याच्या कुटुंबियाचा कोणताही दोष नव्हता. त्यांनी फक्त बहिणीची मुलगी म्हणून त्याच्या लग्नात मध्यस्थी केली होती. या वादा मध्यस्थीलाच विशाल याने धरून त्याना दोष दिल्यावर ही घटना घडली होती.टाळी कधीच एका हाताने वाजत नाही हे म्हणतात हे अगदी बरोबर आहे यात दोष कोणाचा आणि सजा कोणाला हा प्रकार दिसून येतो.हल्ली मध्यस्थी करणे देखील कसे भोवते हेच या घटनेवरून दिसून येते.

## अल्पवयीन मुलांना समजावणे जीवघेणे...

होता. आनंदच्या नादी लागून त्याला देखील मद्यपानाचे व्यसन जडले होते. पंधरा वर्ष वयाचा तो अल्पवयीन मित्र त्याच्या घराजवळच रहात होता. आनंदच्या संगतीत आल्याने तो देखील देवदास बनला होता. अशाप्रकारे आनंद आणि त्याचा तो बालमित्र दर शनिवारी मेहरुण तलाव परिसरात मद्यपानासाठी न चुकता जात होते. मॅकडॉल व्हिस्की हा दोघांचा आवडता ब्रँड होता. भारतीय चलन १४० रुपये किमतीची क्वार्टर प्रमाणातील व्हिस्की प्राशन केल्यानंतर दोघांचा शारिरीक व मानसिक थकवा पळून जात असे. मद्याचे घोट घशाखाली रिचवल्यानंतर दोघांच्या वागण्या-बोलण्यात क्षणीक परिवर्तन होत असे. १४० रुपये किमतीची व्हिस्की, पाण्याची लहान बाटली, दोन डिस्पोजल ग्लास आणि जोडीला अल्प स्वरुपातील खाद्यपदार्थ (चखणा) असे साहित्य घेतल्यानंतर ते जळगावच्या मेहरुण तलाव परिसरातील निवांत आणि मोफत जागेचा आसरा घेत असत. या मोफत जागेचा ते मद्यप्राशन करण्यासाठी पुरेपुर वापर करुन घेत होते. हॉटेलमधे गेल्यावर सिटींग चार्ज द्यावा लागतो. मात्र ओसाड निर्मनुष्य जागी मद्यप्राशन करायला गेल्यावर सिटींग आणि वेटर चार्ज लागत नाही. त्यामुळे अनेक मद्यशौकीन अशा एकांत जागेची निवड करत असतात. त्याला आनंद व त्याचा अल्पवयीन साथीदार देखील अपवाद नव्हते. आनंदचे वडील बांधकाम ठेकेदाराकडे मजुरीने कामाला जात होते. जेमतेम दहावी शिकलेला आनंद एका पाईप कंपनीत रोजंदारीने कामाला जात होता. महिन्याच्या प्रत्येक शनिवारी आनंद व त्याचा बालमित्र ठरवून मद्यप्राशनाचा आनंद लुटत होते. कधी आनंद तर कधी त्याचा अल्पवयीन मित्र मद्याचा खर्च पेलत होता. दर शनिवारी मद्यप्राशन करण्याच्या दोघा मित्रांच्या कार्यक्रमाला अखेर लगाम बसला. ९ एप्रिल २०२२ हा शनिवारचा दिवस होता. या दिवशी आनंद आणि त्याचा साथीदार असे दोघेजण सकाळी दहा वाजता इच्छादेवी मंदीर परिसरात एकमेकांना भेटले. इच्छादेवी मंदीर परिसरातील मद्याचे दुकान ग्राहकांच्या प्रतिक्षेत उघडले होते. या दुकानातून आनंदने त्याचा आवडता ब्रँड, मॅकडॉल व्हिस्कीची क्वार्टर घेतली. तेथून नेहमीप्रमाणे दोघांनी डी मार्ट मार्गे मेहरुण तलावाच्या दिशेने मार्गक्रमण केले.

डी मार्टसमोर असलेल्या एका हातगाडीवरुन दोन डिस्पोजल ग्लास व पुढे मेहरुण तलाव परिसरातून पाण्याची बाटली असा मद्यपानाला आवश्यक घटकांचा संच त्यांनी तयार केला. आता आपल्याला कुणी बोलणार नाही व टोकणार नाही असा मनाशी समज करुन दोघांनी एका झाडाखाली मद्यपानासाठी भारतीय बैठक जमवली. हळूहळू दोघांचा कार्यक्रम रंगात येण्यास सुरुवात झाली होती. दरम्यान त्याठिकाणी दिनेश पाटील नावाचा तरुण देखील आला. घरुन निघतांना पत्नीसोबत वाद झाल्याने दिनेश पाटील हा अगोदरच तणावात होता. त्याला देखील तणाव घालवण्यासाठी मद्यपान करायचे होते. त्यामुळे दिनेश देखील मद्यप्राशन करण्यासाठी रिकाम्या जागेच्या शोधात होता. दिनेश हा दोघांसाठी अनोळखी होता. दरम्यान त्याची नजर आनंद व त्याचा साथीदार अशा दोघांवर गेली. एवढ्या कमी वयात दोघे मुले मद्यपान करत असल्याचे बघून दिनेशला त्यांचा राग आला. साधी मिसरुड देखील फुटलेली नसतांना दोन्ही मुले मद्याच्या आहारी गेल्याचे बघून तो त्यांच्यावर चिडला. हे मद्य पिण्याचे तुमचे वय आहे का रे? असे दिनेशने दोघांना अधिकारवाणीने दरडावले. अगोदरच पत्नीसोबत वाद झाल्याने तणावाखाली असलेल्या दिनेशने संतापाच्या भरात आनंदच्या बालमित्राच्या कानशिलात लगावली. आपल्यापेक्षा वयाने मोठा आणि शरीराने दणकट असलेल्या दिनेशने संतापात आपल्या बालमित्राच्या कानशिलात लगावल्याचे बघून आनंद काही वेळ स्तब्ध झाला. मात्र कानशिलात बसल्यामुळे आनंदच्या बालमित्राच्या मनातील खुद्दारी जागी झाली. तो केवळ पंधरा वर्षाचा असला तरी चढ्या आवाजात दिनेशला म्हणाला की आम्ही आमच्या पैशाने विकत घेऊन मद्य घेतो. शब्दामागे शब्द वाढवून अगोदरच खराब झालेली मनस्थिती अजून खराब करण्यापेक्षा इथून निघून गेलेले बरे असे मनाशी म्हणत दिनेशने तेथून काढता पाय घेतला. दिनेश तेथून निघून गेल्यावर या दोघांची देखील मानसिकता बिघडली होती. दोघांनी आपले उर्वरीत मद्याचे घोट घशाखाली ढकलून पेग पुर्ण केला. कधी मनातल्या मनात तर कधी मुखावाटे दोघांनी दिनेशबद्दल आपला राग व्यक्त करत तेथून आपापल्या घराच्या दिशेने प्रस्थान केले. वाटेत सिमेंटच्या नाल्यालगत दिनेश मद्याच्या नशेत लोळत पडल्याचे दोघांनी पाहिले. जवळच त्याची मोटार सायकल देखील उभी होती. त्याला पाहताच दोघे क्षणभर अवाक झाले. आनंदच्या बालमित्राने त्याला निरखून पाहिले असता हा तोच आपल्या कानशिलात मारणारा असल्याचे त्याने ओळखले. संतापाच्या भरात आनंदच्या बालमित्राने जवळच पडलेला दगड उचलून त्याच्या मोटारसायकलच्या दिशेने भिरकावला. दगडाचा मार लागताच दिनेशची मोटार सायकल खाली पडली. त्यानंतर दिनेशच्या दिशेने दोघांनी दगड भिरकावण्यास सुरुवात केली. दगडाने ठेचला गेल्यामुळे मद्याच्या नशेतील दिनेश जखमी झाला. संधी मिळाल्याने दोघांनी दिनेशवर दगडफेक करुन आपला सर्व संताप बाहेर काढला. आपल्या बालमित्राचा वाढत असलेला संताप बघून आनंदने त्याला ओढून दुर केले. त्यानंतर दोघे पुन्हा इच्छादेवी मंदीराकडे आले. त्यावेळी दुपारचे दोन वाजून गेले होते. काही वेळाने दोघे जण आणखी एका मित्राला भेटायला गेले. आम्ही हाफ मर्डर केला असल्याचे दोघांनी त्या मित्राला कथन केले. हाफ मर्डर कुठे केला व कुणाचा केला हे बघण्याची उत्सुकता दोघांच्या त्या तिस-या मित्राला लागली. त्याने दोघांना लागलीच आपल्या मोटार सायकलवर बसवून घेतले. वाटेत इच्छादेवी चौकात आनंद मोटारसायकलवरुन खाली उतरुन गेला. त्यानंतर दोघे मेहरुण तलाव परिसरातील घटनास्थळी गेले. त्याठिकाणी अजूनही दिनेश रक्तबंबाळ अवस्थेत पडून होता. यावेळी पुन्हा दिनेशच्या डोक्यावर आणि इतर अंगावर आनंदच्या बालमित्राने दगडफेक करुन त्याला मोठ्या प्रमाणात जखमी केले. जखमी दिनेशचा मोबाईल आनंदच्या बालमित्राने काढून घेतला. त्यानंतर दोघांनी तेथून लागलीच पलायन केले. दरम्यान दिनेशची पत्नी त्याला सारखे सारखे फोन करत होती. मात्र दिनेशचा फोन लागत नसल्याने ती तणावात आली होती. दिनेशसोबत वाद झाल्याने त्याची पत्नी चोपडा तालुक्यात माहेरी निघून आली होती. तीने दिनेशचा भाऊ जिजाबराव यास फोन करुन सर्व प्रकार कथन केला. दगडाने ठेचून प्राणघातक हल्ल्यात तरुण जखमी झाला असल्याची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस स्टेशनचे प्रभारी पो.नि. अरुण धनवडे यांच्यासह पोलिस उप निरीक्षक अनिस शेख, पोलिस उप निरीक्षक दिपक जगदाळे, सहायक फौजदार अतुल वंजारी, सहायक फौजदार आनंदसिंग पाटील, किशोर पाटील, सुधीर साळवे, इमरान सैय्यद, गोविंदा पाटील, मुकेश पाटील, मुदस्सर काझी, सचिन पाटील, योगेश बारी, हेमंत कळसकर आदींनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस पथक घटनास्थळावर पोहोचण्यापुर्वीच दिनेशने आपला जीव सोडला होता. त्याच्या मोटार सायकलच्या क्रमांकावरुन त्याची ओळख पटण्यास वेळ लागला नाही. उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातून दुचाकी मालक व त्याचा मोबाईल क्रमांक मिळवण्यात आला. घटनास्थळावरील मयत हा दुचाकी चालक दिनेश पाटील असल्याचे निष्पन्न झाले. दिनेश भिकन पाटील हा सुप्रिम कंपनीतील कर्मचारी असल्याची माहिती अधिक तपासात पुढे आली. दिनेशचा मृतदेह शव विच्छेदनकामी सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर मयत दिनेशचा भाऊ जीजाबराव पाटील व काही नातेवाईक लागलीच एमआयडीसी पोलिस स्टेशनला आले. तेव्हा पोलीसांनी त्यांना सामान्य रुग्णालयात जावून मृतदेहाची ओळख पटवण्यास सांगितले. सर्वजण लागलीच सामान्य रुग्णालयात गेले. शव विच्छेदन गृहात शव पाहताच सर्वांनी दिनेश यास ओळखले. सकाळी पत्नीसोबत दिनेशचा वाद झाल्याचे त्याचा भाऊ जिजाबराव यास समजले होते. त्यानंतर दुपारी दगडाने ठेचून त्याची हत्या झाल्याचे समजताच जिजाबराव पाटील यास रडू कोसळले. दिनेश पाटील याच्या हत्येप्रकरणी त्याचा भाऊ जिजाबराव पाटील याने दिलेल्या फिर्यादीनुसार एमआयडीसी पोलिस स्टेशनला अज्ञात व्यक्तीविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. २४९/२२ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल करण्यात आला. पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे यांनी या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.किरणकुमार बकाले यांच्याकडे सोपवला. या गुन्ह्याच्या तपासकामी पो.नि. किरणकुमार बकाले यांनी पोलिस उप निरीक्षक अमोल देवढे, सहायक फौजदार अशोक महाजन, पोहेकॉ विजयसिंग पाटील, जितेंद्र पाटील, सुधाकर अंभोरे, अक्रम शेख, पोना राहुल पाटील, विजय पाटील, प्रितम पाटील, पोलिस नाईक इश्वर पाटील, संदीप साळवे, पोहेकॉ भारत पाटील, विजय चौधरी दर्शन ढाकणे आदींचे दोन पथक तयार केले. जळगाव शहराच्या तांबापुरा परिसरातील एका अल्पवयीन बालकाने सदर गुन्हा केल्याची गोपनीय माहिती तपासादरम्यान पो.नि. किरणकुमार बकाले यांना समजली. त्या माहितीच्या आधारे त्यांनी आपल्या तपास पथकातील सहकाऱ्यांना योग्य त्या सुचना दिल्या. टप्प्याटप्याने माहिती घेत तपास पथकाने तांबापुरा भागातून एका संशयीत बालकास ताब्यात घेत त्याची विचारपुस केली. हळूहळू त्याच्याकडून घटनेची हकीकत बाहेर येण्यास सुरुवात झाली आणि रागाच्या भरात त्याने दोन अल्पवयीन मुलानी दिनेशला ठार मारल्याचे उघडकीस आले. स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यातील अल्पवयीन बालकाने दिलेल्या माहितीच्या आधारे त्याचा मित्र आनंद माळी याला देखील तपास पथकाने ताब्यात घेत अटक केली. त्याने देखील आपला गुन्हा कबुल केला. दोघांना अधिक तपासकामी एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. अल्पवयीन बालकाची बाल सुधारगृहात रवानगी करण्यात आली. आनंद सदाशिव माळी याला न्यायालयात हजर करण्यात आले. सुरुवातीला त्याला २० एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर त्याच्या न्यायालयीन कोठडीत रवानगीचे आदेश देण्यात आले. या गुन्ह्याच्या आरोपींबाबत प्रथमदर्शनी कोणतीही माहिती तसेच कोणताही भौतीक पुरावा उपलब्ध नव्हता. तरी देखील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पारंपारीक पध्दतीने सदर खूनाचा गुन्हा अल्प कालावधीत उघडकीस आणला. या गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पो.नि. प्रताप शिकारे व त्यांचे सहकारी राजेंद्र कांडेकर, दिपक चौधरी करत आहेत.

क्राईम संध्या | सोमवार दि. ०२ मे २०२२ ते रविवार दि. ०८ मे २०२२ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

# वसुंधरा संवर्धनात स्व जबाबदारी अधिक महत्त्वाची -डॉ.अमोल लाटे

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात जागतिक वसुंधरा दिनानिमित्त विस्तार व्याख्यान

**लातूर/प्रतिनिधी**

सध्या पृथ्वीतलावर ग्लोबल वार्मिंगच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहे तेव्हा वसुंधरेचे संवर्धन करण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाची स्व: जबाबदारी महत्त्वाची महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन शिवनेरी महाविद्यालयातील पर्यावरण विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ.अमोल लाटे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील भूगोल विभाग, समाजकार्य विभाग, राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वसुंधरा दिनानिमित्त विस्तार व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यामध्ये ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते तर विचार मंचावर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, आयक्यूएसी समन्वयक तथा भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.बी.एम.गोडबोले, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश मौने, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय गवई आणि भूगोल मंडळ सचिव भाग्यश्री



पांढरे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर आणि पृथ्वी गोल यांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना डॉ.अमोल लाटे म्हणाले की, २२ एप्रिल हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आज पर्यावरण संवर्धनाची चळवळ उभी करणे अत्यंत आवश्यक आहे मानव आणि पर्यावरण यांचा घनिष्ठ संबंध निर्माण करण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती करणे अत्यंत आवश्यक असल्याचे ते म्हणाले. यावेळी प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी महाविद्यालयांमध्ये विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात आज दिनदर्शिकानुसार जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंतीचे औचित्य साधून आपण वसुंधरा दिन साजरा करीत आहोत याचा मला मनस्वी आनंद झाला आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, समाजकार्य विभाग आणि भूगोल विभागातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित आहे याबद्दल मी कृतज्ञ आहे. या कार्यक्रमामध्ये कॅप्टन डॉ.बी.एम.गोडबोले, डॉ.दिनेश मौने, विद्यार्थी अक्षय शिंदे आणि विद्यार्थिनी गीता बंडगर यांनी आपापली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, पृथ्वीला आपण माता मानतो. पृथ्वीवरील सर्व बाबी आपल्या शरीराशी संबंधित असतात. आज आपण प्रत्येकाने वसुंधरेच्या संवर्धनामध्ये संकल्प करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगून २६०० वर्षांपूर्वी तथागत गौतम बुद्धाने पर्यावरणाशी जवळीक साधून जगाला ज्ञान दिले त्यामुळे आपण सर्वांनी त्याचा अभ्यास करणे गरजेचे असून आपण सेवक आणि कार्यकर्ता म्हणून काम करावे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संजय गवई यांनी केले, पाहुण्याचा परिचय डॉ.अभयकुमार धाराशिवे तर आभार डॉ.शिवप्रसाद धरणे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ.संगम धाराशिवे, डॉ.तेजश्री महाजन, प्रा.राहुल साळुंके, प्रा. नारायण कदम, डॉ.शिवकुमार इजारे, योगेश मोदी, अक्षय आठवले, प्रशांत कांबळे, किशोर पडवळ, सौरभ देशमुख आणि बालाजी डावकरे यांनी बहुमोल सहकार्य केले.

# भिवंडी शहरात खुलेआम हुक्का पार्लर राजरोस सुरु

## ठाणे पोलिस आयुक्तांनी कारवाई करण्याची मागणी

**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैद्य हुक्का पार्लर या व्यवसायाचे खुलेआम दुकाने सुरू झाले असून स्थानिक शहर पोलीस ठाण्याचे अर्थपूर्ण आशीर्वादाने ते सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. परंतु या हुक्का पार्लरमध्ये धूर सोडण्यासाठी नशा करण्यासाठी येणाऱ्या तरुणांच्या मुळे शाळकरी मुले, ये जा करणाऱ्या महिला, मुली, नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे हुक्का पार्लर सुरु असलेल्या ठिकाणावरील स्थानिक नागरिक कंटाळले आहेत. अशाच पद्धतीने एक हुक्का पार्लर फुलेनगर, हनुमान टेकडी रोड या ठिकाणी सुरू असून त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दलित नागरिक राहत असून वेगवेगळ्या ठिकाणाहून हुक्का पिण्यासाठी येणाऱ्या नशेडी तरुणांच्या छेडछाडीच्या आणि स्टंटबाजी च्या त्रासाला कंटाळले आहे. तसेच ताडाळी रोड या ठिकाणी ग्रीन फार्म हाऊस याठिकाणी दिवस-रात्र हुक्का पार्लर सुरू असून स्थानिक उत्तर भारतीय रहिवासी तसेच स्थानिक भिवंडीकर नागरिक यांनी वेळोवेळी तक्रारी करूनही पोलिसांनी साफ दुर्लक्ष केल्यामुळे हुक्का पार्लर चालवण्याची हिंमत अजूनचं वाढत आहे. वेळोवेळी तसे ते बोलूनही दाखवत आहे. शहर पोलिसांचे परमिशन असल्याबाबत सरळ सरळ हे हुक्का पार्लर चालवणारे बोलत आहे. वेळोवेळी रहिवासी आणि स्थानिक नागरिक, पत्रकार यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार देऊनही अद्याप कारवाई झाली नाही. म्हणून स्थानिक रहिवाशांच्या सह्या सह निवेदन देऊन ठाणे पोलिस आयुक्त जयजीत सिंग यांना या गंभीर प्रकरणात लक्ष घालून कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# बाभळगाव आणि शिरशी येथील मियावाकी प्रकल्पाची केली पाहणी

**लातूर/प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन आणि निसर्गा विषयी जागृती निर्माण करण्यासाठी विलासराव देशमुख फाऊंडेशन कडून करण्यात आलेला बाभळगाव आणि शिरशी येथील मियावाकी (घनदाट वृक्ष लागवड) प्रकल्पाची पाहणी ट्वेन्टीवन ग्री लि.,च्या संचालीका सौ. अदिती अमित देशमुख यांनी केली. विलासराव देशमुख फाऊंडेशन व ग्रामपंचायत बाभळगाव यांच्या पूढाकारातून ट्वेन्टीवन ग्री लि., च्या संचालीका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून बाभळगाव व शिरशी येथे मियावाकी (घनदाट वृक्षलागवड) प्रकल्प विकासीत करण्यात आला आहे. या विकसीत करण्यात आलेल्या प्रकल्पाची त्यांनी पाहणी केली. यावेळी टवेन्टिंवन शुगर लि.चे व्हा. चेअरमन विजय देशमुख, संगीता मोळवणे, धनंजय राऊत, उपसरपंच गोविंद देशमुख, अविनाश देशमुख, विष्णू कुंभार (ग्रामसेवक) आदी उपस्थित होते. विलासराव देशमुख फाऊंडेशनकडून पर्यावरण संवर्धन आणि निसर्गा प्रती भावीपिढीला जागृती निर्माण व्हावी म्हणून मियावाकी (घनदाट वृक्षलागवड) प्रकल्प करण्यासाठी लातूर तालुक्यातील बाभळगाव आणि शिरशी गावे दत्तक घेण्यात आली आहेत. या गावात या



प्रकल्पाची सन २०१९ पासून सुरूवात झाली असून झाडांची लागवड झिगज्याग पद्धतीने, दोन झाडांमधील अंतर एक मी प्रमाणे लागवड करण्यात आली आहे. प्लॉटची साईज ४००० स्क्वेअर फूट असून त्यामध्ये एकूण चारशे झाडांची लागवड करण्यात आली. येथे लागवड करण्यासाठी चिंच, वड, पिंपळ, सीताफळ, आवळा, जांभूळ, कडुलिंब, कांचन इत्यादी झाडांची निवड करण्यात आली आहे. झाडांचे अंतर एकमेकांपासून जवळ असल्यामुळे त्यांना वाढीसाठी लागणारे सूर्यप्रकाश मिळण्यासाठी वेगाने वाढ होत गेली. या प्रकल्पातर्गत बाभळगाव -२, हरंगुळ खुर्द-१, कासारगाव -१, शिरसी-१, हणमंतवाडी-१ असे एकूण ६ प्रकल्प उभारण्यात आले आहेत.या प्रकल्पामुळे त्या परीसरात झाडांचे प्रमाण जास्त असल्यामुळे जमिनीची धूप कमी होत आहे, या झाडांमुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढ होण्यास मदत झाली, येथे विविध प्रकारचे पक्षी व फुलपाखरे आढळून येत आहेत. या झाडांच्या परिसर व आजूबाजूचा परिसर अत्यंत निसर्गरम्य निर्माण झाले आहे. या प्रकल्पामुळे शाळेतील लहान मुलांना मोठी जंगले ही कशा प्रकारची असतात हे या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना समजण्यास मदत होत आहे.यावेळी गजानन बोयणे शिरशी गावचे सरपंच कौशल्या कांबळे, सहदेवजी मस्के, रामराजे जाधव, महादू शेळके, नवनाथ पाटील, जि. प शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व गावकरी उपस्थित होते.

# माझं लातूर परिवाराचा ग्रंथसंपदा भेट देऊन गौरव




**लातूर/प्रतिनिधी**

पुणे येथील सुप्रसिद्ध प्रकाशन संस्था मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीने काल जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून उदगीर येथील अ भा साहित्य संमेलनात लातूर येथील माझं लातूर या सामाजिक परिवाराचा ग्रंथसंपदा (६५ नावाजलेल्या साहित्य कृती) भेट देऊन गौरव करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक तथा ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखक दामोदर मावजो यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकप्रिय कादंबरीकार विश्वास पाटील यांच्या हस्ते ही ग्रंथसंपदा माझं लातूर परिवाराच्या सदस्यांना सुपूर्द करण्यात आली. मेहता पब्लिशिंग हाऊसचे दिवंगत संचालक सुनिल मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही ग्रंथसंपदा भेट दिली जाते. माझं लातूर परिवाराचे सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदान आणि समाजोपयोगी उपक्रमांची दखल घेत मेहता प्रकाशन संस्थेने माझं लातूर परिवाराची निवड करून हा सोहळा आयोजित केला होता. याप्रसंगी माझं लातूर परिवाराचे सतीश तांदळे, अभय मिरजकर, प्रमोद गुडे, डॉ सितम सोनवणे, काशिनाथ बळवंते, संजय स्वामी, निशांत भद्रेश्वर, जुगलकिशोर तोष्णीवाल यांच्यासह अनेक साहित्यप्रेमी नागरिक आणि प्रकाशन संस्थेचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# वाडा पोलीस ठाण्याच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा पोलीस ठाण्या अंतर्गत कुडूस पोलीस दुरक्षेत्र यांच्या वतीने कुडूस येथे रमजानच्या पवित्र महिन्यामध्ये इफ्तार पार्टीच्या निमित्ताने एकतेचा संदेश देण्याच्या उद्देशाने सर्व समाजातील बांधवांना एकत्रित करून पवित्र रमजान महिन्यात इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. पवित्र रमजान महिन्यातील २४ वा रोजा (उपवास) दिवशी इफ्तार पार्टी झाली.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जव्हारचे पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत परदेशी व वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील उपस्थित होते. मंगळवारी (२६ एप्रिल) संध्याकाळच्या सुमारास कुडूस येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या दोन वर्षात कोरोना संसर्गाने हाहाकार माजला होता, सर्वत्र कार्यक्रमास बंदी घालण्यात आली होती. यावर्षी राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत पवित्र रमजान महिन्यातील इफ्तार पार्टीला शहरातील सर्व समाज बांधवांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्य राजेश मुकणे, माजी सरपंच इरफान सुसे, काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते रामदास जाधव, माजी उपसरपंच डॉ. गिरीश चौधरी, सचिन जाधव, अमिन सेंदू, श्रीकांत भोईर उपस्थित होते.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या महिला कार्यकारिणीची निवड

**लातूर/प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या नुतन महिला कार्यकारिणीची निवड गुरुवारी करण्यात आली.अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील यांच्या उपस्थितीत जिल्हा व तालुका महिला कार्यकारिणीची बैठक संपन्न झाली. यात ही निवड करण्यात आली. यावेळी लातूर जिल्हा महिला संघटक म्हणून मंजुश्री ढेपे तर लातूर तालुका महिला अध्यक्षपदी सारिका कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.तालुका महिला विभागाच्या संघटक म्हणून पालवी गुंड यांचीही निवड घोषित करण्यात आली.या बैठकीस लातूर जिल्हा संघटक बालाजी पिंपळे, वंदना गायकवाड,लातूर तालुका अध्यक्ष संगमेश्र्वर रासुरे, शहराध्यक्ष इस्माईल शेख,वंदना गायकवाड आदींची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील यांनी ग्राहक पंचायतीच्या आजवरच्या वाटचालीची माहिती दिली.त्यांच्याच हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. बालाजी पिंपळे, रासुरे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

# महापालिकेकडून मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे वेगात

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहर महानगरपालिकेकडून मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे हाती घेण्यात आली आहेत. जेसीबीच्या सहाय्याने मोठ्या नाल्यांची सफाई केली जात आहे. नव्याने विकसित झालेल्या वस्त्यात या स्वच्छते बाबतीत विशेष लक्ष द्यावे तसेच पावसाळा सुरू झाल्यानंतर शहरात कोठेही पाणी तुंबून राहणार नाही, याची दक्षता घ्यावी आणि आगामी आठ दिवसात ही कामे पूर्ण करावीत, अशा सूचना महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी प्रशासनास केल्या आहेत.




आगामी पावसाळा लक्षात घेता मनपाने ही मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी अशी कामे केली जातात. शहरातून वाहणाऱ्या नाल्यांची स्वच्छता केली जाते. शहरातील मोठ्या नाल्यांची स्वच्छता करण्यासाठी जेसीबीचा वापर केला जात आहे. अनेकदा पाण्यासोबत वाहत आलेला कचरा या नाल्यांमध्ये साठून राहतो.त्यामुळे पावसानंतर हे नाले तुंबतात. तसे प्रकार होऊ नयेत याची दक्षता घ्यावी, अशा सूचना महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी स्वच्छता विभागास केल्या आहेत. विविध प्रभागात असणाऱ्या मोठ्या नाल्यांची स्वच्छता सध्या केली जात आहे.त्यापाठोपाठ छोटे नाले स्वच्छ केले जातील. नव्याने विकसित होणाऱ्या वस्त्यांमध्येही मान्सूनपूर्व साफसफाईची कामे केली जावीत असेही त्यांनी सूचित केले. पावसाळ्यास प्रारंभ झाल्यानंतर पहिल्या काही दिवसात गटारी तुंबल्याचे प्रकार घडल्याचे दिसून येते.पहिल्या पावसानंतर कोठेही पाणी तुंबून राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही महापौरांनी प्रशासनास सूचित केले आहे.

# थोडक्यात वृत्तांत

## औसा सोसायटीची निवडणूक बिनविरोध

औसा : औसा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली असून या निवडणुकीमध्ये १३ जागेसाठी फक्त तेराच नामनिर्देशन पत्र दाखल झाल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली आहे. या निवडणुकीमध्ये विजयी उमेदवार पुढील प्रमाणे सुग्रीव विठ्ठल पाटील, सनाउल्ला इसुलाल शेख, राजकुमार रघुनाथराव दुधांकर, जयराज कुंदनसिंह बायास, उमेश गणपतराव पाठक, हनुमंत अंबादास थोरात, श्रीशैल्य मल्लिकार्जुन उटगे, रविशंकर प्रभूप्पाराव चट्टे, अनुसूचित जाती प्रवर्गातून गितेश चंद्रकांत शिंदे, महिला राखीव गटासाठी सुनीता तुकाराम चव्हाण आणि गिताबाई व्यंकट जाधव इतर मागासवर्गीय प्रवर्गातून वसंत संतराम माळी तर भटक्या-विमुक्त प्रवर्गातून बब्रुवान शंकर गाडेकर, यांचे नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले होते. तेरा जागेसाठी तेरा नामनिर्देशनपत्र आल्यामुळे औसा विविध कार्यकारी सेवा सोसायटीची सार्वत्रिक निवडणूक बिनविरोध संपन्न झाली आहे. या निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून के.बी पटेल यांनी काम पाहिले.

## भाच्याने केला मामीवर बलात्कार

औसा : शहरात असणाऱ्या धुणी भांडी करून खाणाऱ्या एका २८ वर्षीय विवाहितेवर तिच्याच भाच्याने दारूच्या नशेत जबरदस्ती बलात्कार केला असल्याची धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली आहे. एकचं खळबळ उडाली आहे. २८ वर्षीय पिडीत महिला ही शहरात आपल्या कुटुंबासोबत राहत आहे. काल पीडिता आपल्या घरी काम करत होती. यादरम्यान तिचा भाच्चा नराधम आरोपींने पीडिता एकटी असल्याचा फायदा घेत तिच्यावर बलात्कार केला आहे. तर याविषयी कोणाला सांगितलं तर तुला व तुझ्या कुटुंबाला जीवे मारू अशी धमकी देखील दिली होती. याप्रकरणी २८ वर्षीय पीडितेच्या फिर्यादीवरून औसा पोलीस ठाण्यात नराधम आरोपिंविरोधात ३७६ (ड), ३२३,५०४, ५०६,४५२ भादवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अवघ्या काही तासात नराधम आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.या प्रकरणाचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक बाळासाहेब डोंगरे करीत आहेत.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. १ मे २०२२ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते दि. १५ मे २०२२ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## दुग्ध व्यवसाय प्रशिक्षणाचा निरोप समारंभ

लातूर : भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्था लातुर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ एप्रिल २०२२ ते दि. २७ एप्रिल २०२२ या दहा दिवसाच्या कालावधीत बँच नंबर २५२ दुग्ध व्यवसाय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. निरोप समारंभ कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ईबुतवार आर बी (संचालक) प्रमुख पाहुणे शिवकुमार झा (भारतीय स्टेट बँक विभागीय महा व्यवस्थापक) डाँ चंदेल (जाँईट कमिशनर पशु संवर्धन विभाग) डाँ. राजकुमार पडीले (जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद लातुर) कराळे बोरगावकर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवकुमार झा म्हणाले की, आपण गाईला देव मानतो पण बहुतांश ठिकाणी स्वच्छता नसते मग जिथे दुग्ध व्यवसाय करणार आहोत तेथे स्वच्छता असने गरजेचे आहे. कारण स्वच्छता शिवाय आपला व्यवसाय वाढु शकत नाही म्हणून दुग्ध व्यवसायात प्रत्येक बाबी मध्ये स्वच्छता असेल तर स्वतः प्रगती होऊन गावचा व लातुरचा व देशाचा विकास होईल असे म्हटले व कार्यक्रमाचे अध्यक्ष ईबुतवार आर बी (संचालक) म्हणाले की दुग्ध व्यवसाय हा कष्टकरी व्यक्ति चा आहे.कष्ट जो करेल तो पुढे जाणार आरसेटी ही उद्योगाचेच धडे देत नाही तर या देशाचा सुनागरीक सुविचारांचा बनला पाहिजे मुलगा- मुलगी समान अशी मानसिकता तयार करुन यशस्वी उद्योजक घडविण्यासाठी प्रयत्न करतो. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतिश डी कांबळे यांनी मानले तर प्रस्तावित सुतार सुधाकर यांनी मानले तर आभार घोडके अशोक यांनी मानले.यावेळी शालीनी येरटे व प्रशिक्षणार्थी महिला पस्तीस उपस्थित होत्या.

## कवी गितकार डॉ.संजय जमदाडे यांच्या कवितेने रसिक मंत्रमुग्ध

उदगीर : उदगीर येथे संपन्न होत असलेल्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोपाच्या दिवशी अकराव्या सत्रात संपन्न झालेल्या कवी कट्ट्यात लातूर येथील ज्येष्ठ कवी गीतकार डॉ.संजय जमदाडे यांनी आपली ' व्यसन ' ही प्रबोधनात्मक कविता सादर करून सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मंचावर ज्येष्ठ कवी प्रा. फ.म.शहाजिंदे मिलिंद शिंदे शिव शंकर पाटील,विजय गायकवाड, अर्चना पौळ,बालाजी मुंडे, शिवाजी स्वामी, संतोष पताळे आदींची उपस्थिती होती. स्वागताध्यक्ष ना. संजय बनसोडे, कार्याध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर,प्रमुख कार्यवाह रामचंद्र तिरुके,मुख्य समन्वयक दिनेश सास्तुरकर यांच्या अथक प्रयत्नातून हे संमेलन उदगीर येथे संपन्न होत आहे तसेच कवीकट्टा समिती समन्वयक मुकेश कुलकर्णी, समिती प्रमुख विवेक होळसंबरे, डॉ. संजय कुलकर्णी आदींनी कवी कट्ट्याच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

02 TO 08 MAY 2022 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 30/04/2022 8:35 PM Page 1



# त्याला बळ देणे महागात पडेल!

हिंदुत्वाच्या मुद्यावर महाराष्ट्रात जे भाजपला करता आले नाही ते राज ठाकरे यांनी एका सभेत करून दाखवले. त्यामुळे भाजपातील स्थानिक भट बामण धास्तावले आहेत. कारण महाराष्ट्रात स्वबळावर सत्ता आणणे इथल्या भाजप नेत्यांना शक्य नाही याची आता भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला चांगलीच प्रचिती आली आहे. कारण काँग्रेस राष्ट्रवादी मधून भाजपात जे उपरे आले ते बिनकामाचे ठरले. फक्त तोंडाच्या वाफा घालवण्या पलीकडे त्यांच्या हातून काहीच घडणार नाही हे आता भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला कळून चुकले आहे. त्यामुळेच राज ठाकरेंना बळ दिले जात आहे. त्यांच्या मागे हिंदुत्वाची ताकत उभी केली जात आहे आणि हे सगळ वेल प्लॉन सुरू आहे आणि भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून बळ मिळत असल्याने राज ठाकरेला जणू आकाश ठेंगणे झाले आहे. त्याच्या अंगात १० हत्तींचे बळ आलेय. पण शिवसेनेला शह देण्यासाठी राज ठाकरे यांना मोठे करणे आज ना उद्या भाजपला चांगलेच भारी पडणार आहे. कारण शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या मुद्यावर असेच भाजपला मोठे करण्याची चूक केली होती आणि ती चूक आज शिवसेनेला महागात पडली आहे. राज ठाकरेंच्या बाबतीत सुद्धा भाजपचे असेच होणार आहे. हिंदुत्वाचा टेकू घेऊन राज ठाकरे मोठे झाले कि त्यांचे पहिले टार्गेट असेल भाजप! आणि भाजपने जे शिवसेनेच्या बाबतीत केले तेच उद्या राज ठाकरे भाजपच्या बाबतीत करणार याची चाहूल इथल्या भाजप मधल्या भट बामनना लागलीय. त्यामुळे ते अस्वस्थ आहेत. आणि याच अस्वास्थ्य भावनेतून ते राजला मनापासून पाठिंबा द्यायला तयार नाहीत. तसे पाहता राज ठाकरे यांच्या मनसेची महाराष्ट्रात फार मोठी संघटनात्मक ताकत नाही. मुंबई, पुणे, नाशिक, कल्याण-डोंबिवली आणि ठाणे वगळता इतरत्र मनसेची ताकद नाही. पण राजच्या जुबानित दम आहे. भावनेच्या भरात वाहवत जाणाऱ्या लोकांसाठी राजची ठाकरी भाषा खूपच फायदेशीर ठरू शकते असे भाजप नेत्यांना वाटत आहे आणि काही अंशी ते खरे आहे. पण जाती धर्माच्या नावावर आक्रमक भूमिका घेणारे लोक समाजातील वातावरण बिघडवण्यासाठी भलेही फायदेशीर ठरले तरी पुढे जेंव्हा त्यांचा ब्रम्हराक्षस होतो, तेंव्हा सगळ्यात प्रथम त्याला ज्याने बनवलेले असते त्यालाच तो गिळण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच आज भाजपकडून राज ठाकरेंना जे बळ दिले जातेय. ते भलेही आज भाजपसाठी उपयोगी पडणारे असले तरी भविष्यात ते भाजपसाठी नुकसान करणारे आहे आणि हिंदुत्व मनणाऱ्यांमध्ये एक असाही वर्ग आहे ज्याला खून खराब नको शांतता हवीय. आणि हा वर्ग नेहमीच राज ठाकरे यांच्या विरोधात आहे. शिवाय महाराष्ट्रातील जो भूमिपुत्र मराठी आहे तो सुरवातीपासूनच भाजपच्या विरोधात आहे आणि आता भाजपने राजला जवळ केल्याने हा वर्ग आणखी चिडलेला आहे. त्यामुळे राजला बळ देऊन भाजपचा फार मोठा फायदा होईल असे वाटत नाही. कारण महाराष्ट्रातले लोक राजकडे फक्त एक टाइमपास म्हणून बघतात. त्यामुळे त्यांचे आताचे हिंदुत्व बुद्धीवादी आणि कर्मठ हिंदुत्व वादी लोकांच्याही पचनी पडणार नाही. कारण लोकांना ठाऊक आहे राज कधीही त्याची भूमिका बदलू शकतो, पण याचा विचार राजला बळ देणाऱ्या भाजपने करायला हवा. राजकारणात आजकाल उगवत्या सूर्याला नमस्कार करण्याची प्रथा आहे. आणि भाजपचा आजवरचा इतिहास पाहता त्यांनी नेहमीच उगवत्या सूर्याला नमस्कार करीत आपली राजकीय वाटचाल सुरू ठेवली आहे. महाराष्ट्रात जेंव्हा बाळासाहेब हयात होते आणि शिवसेनेचा दबदबा होता. तेंव्हा प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे ही भाजपतील दिग्गज मंडळी सतत मातोश्रीच्या अवतीभवती घुटमळत असायची. बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळेच भाजपला महाराष्ट्रात सत्तेची चव चाखायला मिळाली आणि आज तेच भाजपवाले शिवसेनेचे अस्तित्व संपवायला निघाले आहेत. त्यासाठी लोहे को लोहा काटता है... या म्हणीनुसर उद्धव ठाकरेंच्या विरोधात राज ठाकरेंना बळ देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राज ठाकरे यांच्या परप्रांतीय विरोधी धोरणाच्या विरोधात हेच भाजप नेते काय काय बोलत होते आणि राज ठाकरे सुद्धा त्यांची बिन पाण्याने कशी करीत होते हे संपूर्ण देशाने पाहिले आहेत. ज्या उत्तर भारतीयांना राज ठाकरेंच्या मनसैनिकांनी मुंबईतून सळो की पळो करून टाकले होते त्याच राज ठाकरेसाठी उत्तर प्रदेशात आज भाजपवाले रेड कार्पेट अंथरत आहेत, म्हणजे आणि हे सगळ कशासाठी तर कुठल्याही मार्गाने महाराष्ट्रातील सत्ता हस्तगत करता येणे शक्य नाही हे जेंव्हा लक्षात आले तेंव्हा महाराष्ट्रात जातीय तणाव निर्माण करून अशांतता माजवायची आणि केंद्राला राष्ट्रपती राजवट लावायला भाग पाडायचे, यासाठी हे सर्व चाललेले आहे आणि धर्माच्या नावावर सत्तेच्या रोट्या सहजपणे शेकु शकेल. असा एकही नेता भाजपकडे नसल्याने मनसेचे इंजिन भाड्याने घेण्याची त्यांच्यावर पाळी आलीय, पण जोवर या इंजिनला भाजपकडून ऑईल पाणी व्यवस्थित मिळेल तोवरच हे चालेल आणि हिंदुत्वाच्या इंधनावर जर का हे इंजिन चालवण्याचा प्रयत्न केला तर ते दिशा बदलून कधी भाजपच्या तंबूत घुसून तंबू उध्वस्त करील याचा नेम नाही!

# राज्य गुप्तचर यंत्रणा कशी कार्यरत असते?

**दिशायन**



राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानासमोर झालेल्या आक्रमक आंदोलनाप्रकरणी दाखल गुन्ह्यांच्या प्रथम खबर अहवालात (एफआयआर) एसटी कर्मचारी राजकीय व्यक्ती, आमदार, खासदार, मंत्री यांच्या घरासमोर आंदोलन करू शकतात, अशी गोपनीय माहिती येत होती, असे मुंबई पोलिसांनी मान्य केले आहे. त्या पार्श्वभूमीवर भूलाभाई देसाई मार्ग येथील पवार यांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता. पण एवढ्या मोठ्या संख्येने आंदोलनकर्ते तेथे जातील, याचा अंदाज न बांधता आल्यामुळे सुरक्षा भेदून आंदोलनकर्ते थेट पवार यांच्या घरापर्यंत पोहोचले. अतिरिक्त कुमक व वरिष्ठ कर्मचारी येईपर्यंत आंदोलकांनी धिंगाणा घातला. आंदोलनाबाबत गुप्त माहिती हाती असतानाही हा प्रकार झाला. त्यात आंदोलनाच्या तीव्रतेचे आकलन करण्यात पोलीस यंत्रणा नक्कीच अपयशी ठरली. या घटनेमुळे गुप्तचर यंत्रणेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. राष्ट्रीय गुप्तचर यंत्रणांसह मुंबई पोलिसांची विशेष शाखा-१ मुंबई पोलिसांसाठी गुप्तचर यंत्रणेचे काम करते. हे काम कसे चालते ते या लेखातून जाणून घेऊया.

### मुंबई पोलिसांची गुप्तचर यंत्रणा कशी काम करते?

'इंटेलिजन्स ब्युरो' (आयबी), 'रिसर्च अँड ॲनालिसीस विंग' (रॉ) या यंत्रणांप्रमाणे मुंबई पोलिसांची स्वतःची विशेष शाखा हा गुप्त माहिती पुरवणारा विभाग आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त दर्जाचा अधिकारी या शाखेचा प्रमुख असतो. या विभागात आय ब्रँच, आंदोलन विभाग असे विविध उपविभाग आहेत. प्रत्येक परिमंडळात त्यांच्या शाखाही आहेत. धार्मिक, जातीय, आंदोलने, राजकीय अशा विविध क्षेत्रांतील गुप्त माहिती या विभागात एकत्र केली जाते. केंद्रीय यंत्रणांसोबतही हा विभाग समन्वय साधून असतो.

### गिरण्यांसाठी वेगळे पथक

दुसऱ्या पातळीवर मुंबईतील प्रत्येक पोलीस ठाण्यात मिल्स स्पेशल म्हणून अंमलदारही असतात. मुंबईत मोठ्या प्रमाणात गिरण्या कार्यरत असताना त्यांची आंदोलने व्हायची. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण व्हायचा. त्यामुळे मिल्स स्पेशल पथकाची स्थापना करण्यात आली होती. हे पथक गिरणी कामगार व नेते यांच्या माध्यमातून गुप्त माहिती गोळा करू लागले. मुंबईतील गिरण्या कालांतराने बंद झाल्या. पण मिल्स स्पेशल हे पथक अजूनही अस्तित्वात आहे. स्थानिक पातळीवरून कायदा व सुव्यवस्था व सुरक्षेच्या दृष्टीने या पथकाचे अंमलदार माहिती घेत असतात.

### राज्य गुप्तवार्ता विभाग

मुंबई पोलिसांची विशेष शाखा ज्याप्रमाणे स्थानिक पातळीवर काम करते, त्याप्रमाणे राज्य गुप्तवार्ता विभाग हा राज्य पोलिसांचा गुप्तवार्ता विभाग आहे. राज्यातील कानाकोपऱ्यातील घडामोडींची माहिती संकलित करून स्थानिक पोलिसांना देणे हे या विभागाचे काम आहे. याशिवाय केंद्रीय यंत्रणांकडून येणाऱ्या माहितीचे संकलनही या विभागात केले जाते. राजकीय घडामोडींसह अगदी समाजमाध्यमांवरील हालचालींवरूनही माहिती संकलित करून त्याबाबत अहवाल तयार करण्यात येतात .

### तंत्रज्ञानाचा वापर

भारतात कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम- इंडिया (सर्ट-इन), डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलेपमेंट ऑर्गनायझेशन (डीआरडीओ), इंटेलिजन्स ब्युरो (आयबी), रिसर्च अँड ॲनालिसीस विंग (रॉ) या संस्था सायबर विश्वावर नजर ठेवून असतात. नॅशनल टेक्निकल रिसर्च ऑर्गनायझेशन (एनटीआरओ) या संस्थेकडे विश्वरूप ही माहितीच्या महाजालावर बारीक नजर ठेवणारी प्रणाली (सॉफ्टवेअर) आहे. पोलिसांची सोशल मीडिया सेलही यांच्याच तोडीचे काम करत आहे. त्यामाध्यमातून समाजमाध्यमांद्वारेही माहिती मिळवली जाते. आंदोलने, हिंसाचाराच्या घटनांमध्ये समाज माध्यमांवरून महत्त्वपूर्ण माहिती मिळवता येते. याशिवाय महाराष्ट्र सायबर विभागही या क्षेत्रात काम करत आहे. माहिती मिळवणे व अपमाहिती हटवणे आदी काम २४ तास सुरू असते. अपमाहिती हे आता दहशतवादाचेही एक हत्यार बनले आहे. पण आता - माहिती-तंत्रज्ञानाच्या, समाजमाध्यमांच्या, जल्पक म्हणजेच ट्रोल्स आणि बॉट्सच्या काळात - हे हत्यार अधिक धारदार झाले आहे. त्यामुळे समाजमाध्यमांवरील हालचालीही गुप्तचर यंत्रणांसाठी महत्त्वाच्या आहेत. समाजमाध्यमांवर खोटे संदेश पसवण्याचे प्रमाण अधिक आहेत. सामान्य नागरिक त्यालाच खरे मानून ते संदेश पुढे पाठवतात. काही संदेश तर खूपच प्रक्षोभक असतात. अशा प्रकरणांबाबत कठोर कारवाई करण्याचे आदेश यापूर्वीच सर्व पोलिसांना देण्यात आल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. कायदा व सुव्यवस्थेचा तसेच सुरक्षेचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी इंटरनेटवरील संशयित संदेशांवर विशेष लक्ष ठेवले जाते. त्यासाठी ३० पोलिसांचे पथक विविध पाळ्यांमध्ये २४ तास तैनात करण्यात आले आहे. समाजमाध्यमांवरील या संदेशांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी २४ तास समाजमाध्यमांवर जागता पहारा देतात.

### गुप्तचर यंत्रणा जेव्हा अपयशी ठरते

२०१२, जुलैचा दुसरा पंधरवडा. आसाममध्ये बोडो आदिवासी आणि मुस्लिम स्थलांतरित यांच्यात संघर्ष पेटला होता. त्यानंतर दहा-बारा दिवसांतच त्याचा वणवा दक्षिणेकडील राज्यांतही पसरला. ११ ऑगस्टला त्यावरून मुंबईत मोठा दंगा झाला. त्यानंतर भारतीय इतिहासातील फाळणीनंतरच्या सर्वात मोठ्या स्थलांतरास सुरुवात झाली. त्या काळात इंडियन मुजाहिदीनसारख्या दहशतवादी संघटनांच्या कारवायांसाठी ज्ञात असलेल्या भागांतच प्रामुख्याने ईशान्य भारतीयांना लक्ष्य करण्यात आले होते. हा योगायोग नव्हता. पाकिस्तानात उगम असलेल्या संकेतस्थळांवरून, समाजमाध्यमस्थळांवरून, मोबाईल संदेशांतून ईशान्य भारतीयांविरोधात तेव्हा गरळ ओकली जात होती. त्यांच्या मनात भय निर्माण होईल असा मजकूर प्रसारित करण्यात येत होता. हे सरकारच्या लक्षात येईपर्यंत परिस्थिती हाताबाहेर गेली होती. परंतू मुंबईत दंगल सदृश परिस्थिती निर्माण होईपर्यंत परिणामांच्या तीव्रतेचा अंदाज यंत्रणांना आला नाही.

### काय घडले होते?

म्यानमार आणि आसाममधील मुस्लिमांवर झालेल्या कथित अत्याचाराच्या निषेधार्ह हजारो आंदोलक ११ ऑगस्ट,२०१२ च्या दुपारी दक्षिण मुंबईतील आझाद मैदानात एकत्र आले होते. सुमारे ३ वाजून १७ मिनिटांनी, परिसरात दंगल झाली. हिंसक जमावाने पोलिसांवर हल्ला केला, पोलिसांच्या वाहनांना आग लावली, बंदोबस्तावरील पोलिसांवर जमावाने दगडफेक केली, त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या मध्यवर्ती आगारात सार्वजनिक वाहतुकीच्या बसेससह सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले. त्यावेळी दंगलखोरांनी महिला पोलिसांचा विनयभंग केला. दोन रायफल्स (एसएलआर) आणि एक सर्व्हिस रिव्हॉल्व्हर, १६० जिवंत काडतुसे हिसकावून घेतली. सीएसटीतील अमर जवान स्मारकाची मोडतोड केली. पोलिसांच्या, प्रसिद्धी माध्यमांच्या गाड्यांची तोडफोड केली. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराचा वापर करावा लागला.

त्यावेळी तेथे गोळीबारही झाला. दंगलखोरांनी एका पोलिसाचे अपहरण केले होते. त्यानंतर घटनास्थळापासून १०० मीटर अंतरावर तो पोलिस जखमी अवस्थेत आढळला होता. या घटनेत सभेत सहभागी झालेल्या दोन तरुणांचाही मृत्यू झाला होता. त्यानंतर तशी सुमारे अडीचशे संकेतस्थळे बंद करण्यात आली. एका दिवशी पाचहून अधिक एसएमएस पाठविण्यावर पंधरा दिवसांसाठी बंदी घालण्यात आली. परंतु तोवर दंगलखोरांनी एक लढाई जिंकली होती. ही घटना म्हणजे मुंबई पोलिसांचे व त्यांच्या गुप्तचर यंत्रणेचे मोठे अपयश मानले जाते.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल-डिझेल दरवाढी वरून महाराष्ट्र सरकार सहित सर्व राज्यांना खडे बोल सुनावले -बाबूभाई भवानजी

**मुंबई/प्रतिनिधी**



केंद्र सरकारने अबकारी करात कपात करून पेट्रोलच्या किमती आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले, केंद्र सरकारच्या बरोबरीने भाजप शासित राज्यांनी देखील आपल्या अबकारी करात कपात करून जनतेला दिलासा दिला. आज भाजप शासित राज्यात महाराष्ट्राच्या तुलनेत पेट्रोल डिझेल हे १२-१५ रुपये प्रति लिटर स्वस्त आहे. यावरूनच पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी गैर भाजप शासित राज्यांना खडे बोल सुनावले. पंतप्रधानांनी कानउघडणी केल्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय घेतील अशी चर्चा रंगू लागली आहे. पण, नेहमी सारख GST चा गऱ्हाणे मुख्यमंत्री पुन्हा गाऊ लागले. गाऊ द्या पण, एवढं बेसलेस आणि थोतांड ट्विट सी एम ओ ऑफिसच्या हँडलवरून करण्यात येत आहे.

### मुख्यमंत्री काय म्हणालेत या संदर्भात आपण बघू!

उद्धव ठाकरे म्हणतात की, GST चे पैसे केंद्र सरकार देत नाही. पण २०१७ साली GST कायदा लागू झाला. हा कायदा एकट्या केंद्र सरकार ने बनवला नसून, सर्व राज्याच्या वित्तमंत्र्यांनी जे GST कौन्सिलमध्ये सदस्य असतात त्यांच्या सहमतीने बनलेला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे आता परिषदेचे अध्यक्ष आहेत. मुख्यमंत्री म्हणतात ना, GSTचा परतावा मिळत नाही, पेंडिंग आहेत. यात कोणतेही तथ्य नाही. त्याआधी ऋद्ध प्रणाली समजून घेऊ. GST चे तीन प्रकार आहेत ते पुढीलप्रमाणेः (१) CGST (सेंट्रल-जीएसटी)- यामध्ये केंद्राच्या कर संकलनाचा समावेश होतो. (२) SGST (स्टेट जीएसटी)- यामध्ये कर आकारण्याची जबाबदारी राज्याची असते. यामध्ये केंद्र हस्तक्षेप करत नाही. (३) IGST (इंटिग्रेटेड जीएसटी)- यामध्ये कर संकलन भारतीय संघराज्याच्या अखत्यारीत येते. ते केंद्रीय सरकार गोळा करते, परंतु नंतर ते राज्यांमध्ये हस्तांतरित केले जाते. वरील तीन करांपैकी २ आणि ३ नंबरची करप्रणाली मधून मिळणारी रक्कम ही पूर्णपणे राज्यालाच मिळते. उदा : एखादं आपण TX INVOICE बघितलं असेल त्यात CGST ९% SGST ९% कर लावलेला असेल. या दोन टॅक्स पैकी CGST कराची रक्कम ही केंद्राला मिळते. SGSTची रक्कम ही राज्याला मिळते. एखाद्या कंपनीने १८ टक्के टॅक्स भरला असेल तर त्या १८ टक्क्यांमधून ९ टॅक्स हा राज्याला ताबडतोब मिळतो. अशी व्यवस्थाच आहे. इथं कोणताही विलंब वगैरे काहीही नसत. केंद्र सरकार पैसे देत नाही, बाकी आहेत वगैरे हे थोतांड आहे. स्वतः अजितदादा म्हणतात सर्वकाही वेळेवर मिळत आहे. मग आता तुम्हाला दुसरा आरोप मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचा डोक्यात आला असेल. उद्धव ठाकरेंचा म्हणतात की, GSTचे पैसे २४ हजार कोटी पेंडीग आहेत. उत्तर : जेंव्हा GST लागू झाली तेंव्हा केंद्र सरकार आणि GST कौन्सिलमध्ये करार झाला. त्यात असं ठरलं की, GST संकलनात राज्याच्या तिजोरीत झालेली आर्थिक तूट भरून काढण्यासाठी, केंद्रसरकार GST आर्थिक वर्षात म्हणजे जुलै ते जुलै पर्यन्त सर्व राज्यांना कॉम्पेनशेसन देण्याचं मान्य केलं. हे कॉम्पेनशेसन फक्त २०१७ ते २०२२ पर्यन्त असेल. म्हणजे पहिल्या GST पंचवार्षिक मध्येच देयाच ठरवलं होतं. GST पहिले वर्ष २०१७-१८ मध्ये ३०७७ कोटी रुपयांच संपूर्ण कंपेनसेशन मिळालं. GST दुसरे वर्ष २०१८-१९ मध्ये ९३६३ कोटी रुपयांच संपूर्ण कंपेनसेशन मिळालं. GST तिसरे वर्ष २०१९-२० मध्ये १९२३३ कोटी रुपयांच संपूर्ण कंपेनसेशन मिळालं. GST चौथे वर्ष २०२०-२१ मध्ये ४०३९८ कोटी रुपयांच संपूर्ण कंपेनसेशन मिळालं. GST चौथे वर्ष २०२१-२२ मध्ये १३७८२ कोटी रुपयांच संपूर्ण कंपेनसेशन बाकी आहे. जे की जुलै पर्यत केंद्र सरकारला राज्य सरकारला देणं आहे. या मिळालेल्या कंपेनसेशन व्यक्तिरिक्त राज्याला SGSTच्या माध्यमातून दरवर्षी सरासरी ५०-६० हजार कोटी रुपये मिळतात. मुख्यमंत्री म्हणतात महाराष्ट्रावर सापत्न वागणूक दिली जात आहे. कदाचित त्यांना GST बद्दल त्यांचा अभ्यास कमी आहे. नीती आयोग सर्व राज्यांना GST वितरण करते, नीती आयोगानुसार GST वितरित होतो. मुख्यमंत्री यांना याबद्दल माहितीही नसेल. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणतात की, महाराष्ट्र सर्वाधिक कर देणारं राज्य आहे. उत्तर : महाराष्ट्र सर्वाधिक कर देणारं राज्य आहे. हे सत्य आहे. त्यानंतर हे देखील सत्य आहे की, आजपर्यंत महाराष्ट्रालाच सर्वाधिक निधी मिळाला आहे. हे सांगायला ते विसरतात. आणि महाराष्ट्र सर्वाधिक कर देतो म्हणून सांगता हे काय कुणाच्या घरातून कर दिला जात नाही. उद्योगधंदे करणाऱ्या लोकांकडून कर दिला जातो. त्याच लोकांच्या घरासमोर जिलेटीनच्या कांड्या ठेवत असता. पेट्रोल डिझेल वरील कर कमी करा म्हटल तर याना GST आठवली. जर एवढं तुटवडा होता तर दारुवरील कर का कमी केले? दारुवरील कर कुणासाठी कमी केलं? जनतेसाठी तर केलं नाही विदेशी मद्य बनवणाऱ्या कंपन्यांसाठी केलं. मग महाराष्ट्राच्या जनतेने काय पाप केलं? साधं गणित आहे, शेजराच्या राज्यात पेट्रोल १५-१८ रूपयाने कमी मिळतोय. ते यासाठीच मिळतो ना की त्या राज्यांनी पेट्रोलवरील कर कमी केलेत. पण, तुम्हाला राज्यात करायचं नाही. केलं तर खापर कसं फोडता येईल केंद्रावर? त्यामुळं जनतेला उपाशी ठेवण्याचे धंदे चालू आहेत.

# शेतीनिष्ठ दिनकर पाटील यांना वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार



शेतकरी दिनकर विठ्ठलराव पाटील यांनी शेतकऱ्यांसाठी मधुमक्षीकापालन प्रशिक्षण शिबीर आयोजित करुन मार्गदर्शन केलेले आहे, मधमाशीचे योग्य संगोपन करण्यासाठी कार्यक्रम करतात. म्हणजे ते ऐकूणच मधमाशाचे अभ्यासक आहेत. सध्या निर्सगातील मधमाशा खूप मोठ्या प्रमाणात नष्ट झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे परागीकरण होत नाही. पर्यायाने उत्पादकता कमी होते व शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत, त्यावर उपाय म्हणून ज्या शेतकऱ्यांना पॉलिनेशनची गरज आहे. त्यांच्या शेतावर मधमाशांच्या पोळ्या ठेऊन त्यांच्या पिकांचे परागीकरण करण्याचे काम मागील १२ वर्षापासून अविरत चालू आहेत, त्यामुळे त्यांचे कित्येक लाख रुपयांचे उत्पन्न वाढत आहे. किपरर्सच्या माध्यमातुन वेळोवेळी प्रशिक्षण शिबीरे घेऊन शेतकरी बांधवांना मधूमक्षीका पालन विषयी मार्गदर्शन तर ते करतातच त्याबरोबर फळबाग लागवड आंबा, सिताफळ व इतर फळे लागवड स्वतःच्या शेतात करून इतरांनाही धडे देतात. विविध कृषी विज्ञान केंद्रात जाऊन शेतकऱ्यांना माहिती देतात. देशांतर्गत दौऱ्याबाबतची माहिती उदा. किसान कृषी ग्रो शासनाच्या कृषी प्रदर्शनास कृषी विज्ञान केंद्रे, ग्रोवन कृषी विदयापीठे यांना दरवर्षी नियमित भेट देऊन तंत्रज्ञानाची महिती घेतात. उत्पादित मालाच्या मूल्यवृध्दी व विक्रीसाठी संपूर्ण भारतात ऑनलाईन व्दारे मधविक्री करतात. नामांकित संस्थेचे सदस्य आहेत. (एन.एच.बी- ब्रिडर म्हणून मान्यता, सदस्य, नॅशनल बी बोर्ड, दिल्ली, भारत सरकार, मास्टर ट्रेनर, केंद्रचालक खादी ग्रामउद्योगमंडळ महराष्ट्र राज्य) प्रशिक्षण दरवर्षी दर वर्षी जुन ते सप्टेंबर चार महिन्याच्या कालावधीसाठी निवासी प्रशिक्षण आयोजित केले जाते. व मार्गदर्शन केले जाते. कांदयाचे बिज उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना मधमाशीची आवश्यकता असते त्यांची ती गरज लक्षात घेऊन कांदा बिज उत्पादनासाठी शेतक-यांना अत्यअल्प दरात मधमाश्यांचे वसाहती उपलब्ध करुन देतात. सकाळ इंटरनॅशनल लर्निग स्कूल पुणे यांच्याकडून मधूकक्षिकापालन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी मागील सहा वर्षापासून विषयतज्ञ म्हणून वर्षातून चार वेळा ते तिथे जातात. खादी ग्रामउद्योग महाबळेश्वर यांचे १ महिन्यांचे केद्रचालक हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करुन यांच्या विविध प्रशिक्षणवर्गात विषयतज्ञ म्हणूनही ते जातात. परदेशी दौरा आफ्रिकेतील इथीयेपिया या देशात २०१७ साली तेथील अदिवासी लोकांकडून शास्त्रोक्त मधमाशी पालनाचे एक महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या त्यांनी पूर्ण केले आहे. कृषि गट मधमाशी पालनाचा प्रसार व त्यांचे शेतातील महत्व शेतकऱ्यांना पटवुन देण्यासाठी कृषिगटाची स्थापना त्यांनी केली आहे व त्यातून शेतकऱ्यांमध्ये मधमाशी पालनाच्या जागृकतेचे काम अविरतपणे सुरु आहे. त्यामुळे परिसरातील शेकडो शेतकऱ्यांना त्याचा लाभ होतो व त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढते. दरवर्षी जवळपास दिड ते दोन हजार विद्यार्थी त्यांच्या मधमाशी पालनाच्या उदयोगाला भेट देतात व एक दिवसाचे मार्गदर्शन घेऊन जातात.

**- युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

02 TO 08 MAY 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 30/04/2022 8:36 PM Page 1



# दिघी पोलीस ठाण्याच्या हद्दीत जवळपास शंभर ते सव्वाशे लॉजिंगचे जाळे

**आळंदी/अंगद राठोडकर**

एक पवित्र आणि धार्मिक ठिकाण अशी ओळख असलेल्या आळंदी परिसरालाच पवित्र तीर्थक्षेत्र अशी अध्यात्मिक ओळख आहे. परंतु गेल्या काही वर्षात हीच ओळख पुसून काढण्यात काही स्थानिकांनी चांगलाच पुढाकार घेतला आहे. लॉजिंग व्यवसायाच्या नावाखाली कोणत्याही अनधिकृत जोडप्यांना आपल्या लैंगिक सुखासाठी भाड्याने जागा देऊन, त्यातून बक्कळ पैसा कमावण्याचा धंदा अगदी जोरात चालवला जात आहे. या अवैध धंद्याला हातभार लावण्यात दिघी आणि आळंदी पोलिसांचा सिंहाचा वाटा असल्याची चर्चा आहे. हाकेच्या अंतरावर दिघी आणि आळंदी पोलीस ठाणे, त्यात भरीस भर म्हणून चऱ्होली फाट्यावरच सह पोलीस आयुक्त कार्यालय कार्यरत आहे. विषय म्हणजे या कार्यालयाच्या प्रमुख असलेल्या सह पोलीस आयुक्त याही एक तरुण महिला अधिकारी आहेत. मात्र या पवित्र परिसरात वाढत चाललेला हा किळसवाणा आणि लाजिरवाणा धंदा बंद करण्यात कोणीही पुढाकार घेत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या लॉजिंग शेजारच्या भागात मोठ्या प्रमाणात नागरी वसाहती आहेत. मंदिरे, शाळा, महाविद्यालये, विविध धार्मिक मठ, संस्थान, देवस्थान, शिवाय आळंदी येथील पवित्र व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचे समाधी स्थळ, संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे तीर्थक्षेत्र अशी पवित्र धार्मिक ठिकाणे आहेत. याच पवित्र धार्मिक स्थळाच्या शेजारी घडणाऱ्या सदर अनधिकृत प्रकाराला या परिसरातील नागरिक कंटाळले आहेत. स्थानिक पोलीस ठाण्यात कोणी याबाबत तक्रार केलीच तर थातुर मातुर कारवाई करून मोकळे होतात. नंतर आहे तेच सुरु राहत असल्याच्या तक्रारी नागरिक करताना दिसत आहेत. या लॉजिंग मुले अनधिकृत संबंधाना राजाश्रय मिळत असल्याने या लॉजिंग मध्ये दिवसेंदिवस प्रेमी युगुल व अनैतिक संबंधातील अनधिकृत जोडप्यान्चा वावर वाढला आहे. यातूनच खून, मारामाऱ्या, आत्महत्या असे गंभीर प्रकार सुद्धा अशाच लॉजिंग मध्ये यापूर्वी अनेकवेळा घडले आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त म्हणून नव्याने कार्यरत झालेले अंकुश शिंदे यांच्यपुढे या भागातील लॉजिंग वर आळा घालणे एक आव्हान आहे. एक कार्यक्षम व कर्तव्यदक्ष वरिष्ठ अधिकारी म्हणून त्यानी या प्रकाराकडे गाम्भीर्याने लक्ष देऊन हा गैर प्रकार तात्काळ थांबवावा अशी मागणी नागरिक करीत आहेत.

दिघी पोलीस ठाणे हद्दीत जवळपास शंभर ते सव्वाशे लॉजिंग कार्यरत आहेत. दिघी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिघी, चऱ्होली, चोविसावाडी, वडमुखवाडी, साई मंदिर, सयाजीनाथ गायकवा महाराज विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय, चऱ्होली फाटा, देहू फाटा, देहू फाटा ते वाय जंक्शन, वाय जंक्शन ते इंद्रायणी नदी काठावरील भाग, याशिवाय पुणे-आळंदी रस्त्यालगतचा भाग व देहू फाटा ते डुडुळगाव हद्दीपर्यतचा भाग जोडण्यात आला आहे. या एकूणच भागात रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी अशा भव्य लॉजिंग उभारण्यात आल्या







आहेत. वास्तविक आळंदी सारख्या धार्मिक ठिकाणी राज्याच्या व पर राज्यातून येणाऱ्या भाविकांची प्रचंड संख्या आहे. त्यांच्या सोयीसाठी या लॉजिंगचा वापर झाल्यास कोणाला काही वाटण्याचे कारण नाही. मात्र असे येणारे भाविक हे आळंदी आणि देहू यात्रा काळातच अधिक प्रमाणात या भागात राहण्यासाठी आलेले दिसून येतात. बाकी वर्षवभराच्या काळात या लॉजिंग मध्ये प्रेमी युगुल , अनैतिक संबंधातील जोडपे , यांचाच रोजचा वावर झाल्याचे दिसून येते. घरच्या व्यक्तींच्या नजारा चुकवून आलेले हे जोडपे काही वेळा साठी लॉजिंगचा आसरा घेऊन काही वेळातच पसार होतात. अगदी कमी वेळात जास्त पैसा कमावता येत असल्याने काही स्थानिकानी या व्यवसायात आपले पाय रोवत लॉजिंग व्यवसायाला चांगलीच बळकटी दिली आहे. परिसरातील रस्त्यावर आणि लॉजिंग मध्ये कोण येतेय याकडे बाहेरून येणारे भाविक फारसे लक्ष देत नसले तरी या भागात कायम राहणारे गृहिणी महिला, कस्टकरी-कामगार महिला, मुली, मुले, तरुण, मोठ्या वयातील नागरिक यांच्या नजरेतून हि बाब लपून राहू शकत नाही. त्यांना भयंकर मानसिक त्रास होत असला तरीही तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा तशी अवस्था घेऊन या भागातील नागरिक आपले जीवन जगात आहेत.

पुणे-आळंदी मार्गालगत पवित्र धार्मिक ठिकाण साई बाबा मंदिर आणि सयाजीनाथ महाराज विद्यालय आहे. या दोन्ही ठिकाणी पावित्र्य आणि मांगल्याची रोज आरास होते. मात्र नेमके याच परिसरात जवळपास पंधरा लॉजिंग आहेत. ज्यातून रोज देह विक्री आणि खरेदीचा व्यापार होतो. याच परिसरात दररोज काही व्यवसायिक महिला आणि मुली रस्त्यावर अश्लील चाले करीत ग्राहकांना इशारे करीत इकडे तिकडे भटकताना दिसतात. येथे काय घडतेय याची कल्पना या शाळेतील मुलांच्या लक्षात आल्याने बरेच पालक आपल्या मुलांच्या भीतीपोटी त्यानं आरोज शाळेतून घ्यायला व सोडायला येतात-जातात. यात पालक या नात्याने महिलांचा वावर जास्त प्रमाणात दिसतो. अशा वातावरणात घराबाहेर पाडण्यात त्यांनाही संकोच वाटतो, तरीही आपल्या मुलांसाठी त्या हि जोखीम पार करताना दिसून येतात. या लॉजिंगच्या आसपास रहिवासी भाग अधीक आहे. मजूर, कामगार, नोकरदार यांची संख्या मोठी आहे. ते दिवसभर घराबाहेर राहत असल्याने त्यांच्या मनात कायमची घा लमेल असली तरी कुटुंबासाठी काम तर करावेच लागते. या भावनेतून ते आपली घरे सोडून कामावर निघून जातात . घरी राहणाऱ्या महिलाही उसने बळ घेऊन आपले जीवन जगताना दिसून येतात. या भागातील लॉजिंग बंद करावेत या मागण्यांसाठी या भागातील नागरिकांनी अनेकवेळा दिघी पोलीस ठाण्यात तक्रारी केल्या आहेत. मात्र त्यानंतर दोन चार वेळा थातुर मातुर कारवाया केल्या जातात त्याही नागरिकांचे समाधान करण्यासाठी पुन्हा 'येरे माझ्या मागल्या' हा प्रकार सुरूच राहतो.

**खून, आत्महत्या, मारामाऱ्या अशा गंभीर गुन्ह्यांचे माहेरघर**

या भागात लॉजिंगच्या माध्यमातून सुरु असलेल्या या व्यवसायात यापूर्वी अनेक वेळा प्रेमातून खून, आत्महत्या, मारामाऱ्या असे गंभीर गुन्हे घडले आहेत. रहिवासी भागात राहणाऱ्या सुखी संसार करणाऱ्या घरंदाज जोडप्याना या वातावरणाचा मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या भागात राहणारे सर्वाधिक जोडपे हे कामगार, नोकरदार, मध्यमवर्गीय अशा नागरिकांचा परिसर आहे. जवळपास सर्वत्र उद्योग, व्यवसायाचा परिसर आहे. त्यामुळे नेहमी कामानिमित्त घराबाहेर राहणाऱ्या नागरिकांची संख्या जासी मोठी आहे तशीच घरी राहणाऱ्या जोडप्याचीही संख्या मोठी आहे. आपापसात कामानिमित्त झालेल्या ओळखीतून, परस्पर एकमेकांच्या सहवासातून, वाढत्या महागाईच्या काळात एकमेकांना देण्यात आलेला आर्थिक आधार यातून निर्माण होणाऱ्या अनैतिक संबंधाच्या संख्येत झपाट्याने वाढ झालेली आहे. यातूनच निर्माण झालेले अनैतिक संबंध परस्परांना या लॉजिंगचे ग्राहक वाढवण्यात हातभार लावताना दिसून येत आहेत. यातूनच पुढे खून, मारामाऱ्या, आत्महत्या सारखे गंभीर गुन्हे घडत आहेत. त्यामुळे पोलिसांनी लॉजिंग सारख्या व्यवसायांना आला घालत सामाजिक समतोल सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.

**स्थानिकांच्या लॉजिंग असल्याने पुढारी आणि नगरसेवक चिडीचुप्प**

या भागात अस्ताव्स्त पसरलेल्या लॉजिंग या बहुतेक स्थानिक नागरिकांच्या असल्याने त्यांच्याशी वैर घेण्यापेक्षा गप्प राहिलेले बरे असे म्हणत स्थानिक नगरसेवक, पुढारी, विविध संघटनांचे लोकप्रतिनिधी लॉजिंग विषयापासून चार हात लांब राहणेच पसंत करताना दिसतात. याच लॉजिंगच्या परिसरात राहणाऱ्या आपल्याच मतदारांना याचा मानसिक त्रास होतोय याची जाणीव ठेऊन कोणीही त्यावर भाष्य करताना दिसतात नाही. केवळ मतदान करून घेण्यापुरते त्यांच्या सेवेसाठी दाखल होणाऱ्या पुढाऱ्यांना या भागातील नागरिकांचा त्रास दिसत नाही का असा सवालही या भागातील नागरिक करीत आहेत. गेली अनेक वर्षापासून सुरु असलेल्या या अश्लील प्रकाराला या भागातील नागरिक कंटाळले असून ते तीव्र आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याची माहिती या भागातील नागरिकांनी दिली.

**दिघी पोलिसांची कारवाई म्हणजे निव्वळ नाटक**

पूर्वी विश्रांतवाडी पोलीस ठाणे हद्दीत असलेले दिघी पोलीस ठाणे आता एक स्वतंत्र पोलीस ठाणे म्हणून नावारूपाला आले. हे पोलीस ठाणे अस्तित्वात आल्यानंतर काही बदल होईल असे नागरिकांना अपेक्षित होते. मात्र तसे काहीच घडले नसल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत. फार पूर्व काळापासून चालू असलेला वेश्या व्यवसाय आजाही आहे तसाच सुरु आहे. राजे-राजवाडे असलेल्या काळापासून हा एक स्वतंत्र असा व्यवसाय म्हणून नावारूपाला आला असला तरी हा भाग शहराच्या मध्यवर्ती भागात नसावा असे अपेक्षित आहे . मात्र नागरिकांच्या रहिवासी भागात व अत्यंत गर्दीच्या ठिकाणी सुरु असलेला हा व्यवसाय मोडीत काढणे पोलिसांना शक्य असले तरी 'आपले काय जातेय' या भावनेतु त्याकडे दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न होत असल्याचो टीका नागरिक करीत आहेत. विशेष म्हणजे या सर्व लॉजिंग या स्थानिक रहिवाशांच्या आहेत. त्यांचा लॉजिंग व्यवसाय त्यांच्या जागी आहे. आपल्याला दर महा ठराविक स्वरूपात हप्ता मिळत असल्याने पोलीस याकडे गाम्भीर्याने पाहत नसल्याची टीका नागरिक करीत आहेत. पोलीस ठाण्याच्या सर्व शाखाना ठरलेला हपता वेळेवर मिळत असल्याने आपली कामगिरी ही थातुर मातुर कारवाईतून दाखवून दिली जात आहे. दिघी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकारीसह पोलीस आयुक्त याही एक महिला असल्याने त्यांच्याकडून आजही कठोर कारवाईची अपेक्षा केली जात आहे. यापूर्वी दिघी पोलीस ठाण्याच्या वतीने ज्या काही थातुर मातुर कारवाया करण्यात आल्या त्या केवळ एक नाटक असल्याच्या भावना नागरिकांच्या बळावल्या असून नव नियुक्त पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्याकडून कठोर कारवाईची अपेक्षा व्यक्त केळीला जात आहे.

# लसीकरणामुळे बालकास गंभीर आजारांपासून संरक्षण मिळते -डॉ. सरिता मंत्री

## एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक लसिकरण सप्ताह साजरा

**लातूर/प्रतिनिधी**

लसीकरण हा बालकाचा मुलभूत हक्क असून प्रत्येक बालकाचे लसीकरण करुन घेणे ही पालकांची नैतिक जबाबदारी आहे. जन्मापासून ते वयाच्या १५ वर्षापर्यत मुलांचे पुर्ण लसीकरण केल्यास त्यांना २० पेक्षा अधिक विविध गंभीर आजारापासून संरक्षण मिळते. त्यामुळे वेळापत्रकानुसार प्रत्येक बालकाचे लसीकरण करा, असे आवाहन एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासकीय व शैक्षणीक संचालिका डॉ. सरिता मंत्री यांनी केले. येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील बालरोग विभागाच्या वतीने जागतिक लसिकरण सप्ताहनिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. सरिता मंत्री अध्यक्षीय समारोपात बोलत होत्या. या कार्यक्रमास बालरोग विभाग प्रमुख डॉ. विद्या कांदे, डॉ. दत्तात्रय कुलकर्णी, डॉ. शिल्पा दडगे, डॉ. दिपीका भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलताना डॉ. सरिता मंत्री म्हणाल्या की, मुलांच्या आयुष्याचा पाया बाल वयात रोवला जात असून त्यात लसिकरणाची भूमिका महत्त्वाची आहे. बालकांना दिल्या जाणाऱ्या लसीकरण बद्दल भीती बाळगु नये. कारण लसीकरणामुळे बाळाची रोगप्रतिकारशक्ती वाढून त्याचा अनेक आजारांपासून बचाव होतो. त्यासाठी डॉक्टरांनी ठरवून दिलेल्या तारखेनुसार आपल्या बालकाचे वेळेवर लसीकरण करा. लसीकरण केल्यामुळे समुह रोगप्रतिकारशक्ती तयार होऊन लसीकरण न घेणाऱ्यांनाही त्यांचा फायदा होतो. जन्मापासून ते पाच वर्षापर्यचे लसीकरण शासनाने पुर्णपणे मोफत उपलब्ध केलेले आहे. त्याचा बालकांच्या आरोग्यासाठी फायदा करुन घ्यावा. आपल्या देशात लसीकरणामुळेच देवी या आजाराचे समुळ उच्चाटन झालेले असल्याचे डॉ. मंत्री म्हणाल्या. यावेळी प्रास्ताविकात बोलताना डॉ. विद्या कांदे म्हणाल्या की, लसीकरणाचे बालकास सर्वार्थाने फायदेच आहेत. सरसगट लसीकरण होण्यासाठी लसीकरणाविषयीचे गैरसमज दूर होणे आवश्यक आहे. पाच वर्षाखालील बाल मृत्यू दर कमी होण्यास लसीकरण कारणीभूत आहे. मात्र आजही काही लसी बालकांना शंभर टक्के दिल्या जात नाहीत. हे प्रमाण शंभर टक्क्यापर्यत न्यायचे आहे. बालकांना सर्वसाधारण आजारात डॉक्टरांच्या सल्लयाने लसीकरण करता येते. त्या कारणांने लसीकरण लांबविण्याची गरज नाही. दिर्घायुष्य सर्वांसाठी' ही या वर्षीच्या लसीकरण सप्ताहाची थीम असून दिर्घायुष्यासाठी प्रत्येक बालकांचे लसीकरण करा, असे डॉ. कांदे यांनी सांगीतले. यावेळी बोलताना डॉ. दिपीका भोसले म्हणाल्या की, बालकाचे जन्मापासून ते पाच वर्षापर्यत सात वेळा लसीकरण करणे गरजेचे आहे.ॉ

जन्मानंतर लागलीच पहिल्या आठवड्यात बीसीजी - क्षयरोग, पोलिओ, काविळ प्रतिबंधक या तीन लसी नवजात अर्भकास दिल्या जातात. दिड महिन्याला पेंटा १-डीपीटी, घटसर्प, डांग्या खोकला, धनूर्वात मेंदूज्वर, कावीळ ब या पाच आजारांच्या प्रतिबंधासाठी आणि पोलिओ व न्यूमोकोकल १ ही लस निमोनियासाठी इन्जेक्शव्दारे दिली जाते तर तोंडाव्दारे जुलाब प्रतिबंधक रोटावायरस १ व पोलिओ ही लस दिली जातो. अडीच महिन्यानंतर पुन्हा पेंटा व रोटा वायरस, पोलिओचा दुसरा डोस दिला जातो. साडेतिन महिन्यांनी पुन्हा पेंटा, पोलिओ, न्यूमोकोकल इन्जेक्शव्दारे तर रोटा वायरस, पोलिओ तोंडाव्दारे दिला जातो. नऊ महिने पुर्ण झाल्यानंतर गोवर, गालफुगी, रुबेला प्रतिबंधक लस तर जेई १-मेंदूज्वर, विटामिन ए १, न्यूमोकोकल बूस्टर डोस दिला जातो. १६ ते २४ महिन्याच्या कालावधीत डीपीटी बूस्टर, एमएमआर २, जेई २, ओपीव्ही व विटामिन ए २ ही लस दिली जाते. पाच वर्षापर्यत दर सहा महिन्यांनी विटामिन ए चा डोस दिला जातो. डीपीटी बूस्टर ५ ते ६ वर्ष कालावधित, टीटी / डीटी १० वर्ष तर टीटी / डीटी चा डोस १६ वर्षाला दिला जातो. या प्रमाणे बालकाचे लसीकरण केल्यास त्याचे विविध आजारांपासून संरक्षण होते. शासनाने निर्धारित केलेल्या ऐच्छिक लसीशिवाय कांजण्या, काविळ अ, टायफॉईड, एचपीव्ही, फ्यु या लसी डॉक्टरांच्या सल्लयाने योग्य त्या वेळी घ्याव्यात, असे डॉ. भोसले यांनी सांगीतले. यावेळी जागतिक लसीकरण सप्ताहानिमित्त एमआयएनएस नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यानी लसीकरण या विषयी महिती असलेले पोस्टर सादर केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सोनल रे, डॉ. अपर्णा आस्था, डॉ. स्नेहल सोनकांबळे, परिचारीका शाकिरा हिप्परगे, कविता येरमाळे, लिपीक किरण साबळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अखिलेश अंजान यांनी केले तर आभार डॉ. शिल्पा दडगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी गरोदर माता, प्रसुती माता, बालक व नातेवाईक उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.मनोहर कबाडे सरांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

नियत वयोमानानुसार महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मनोहर कबाडे सरांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम भौतिकशास्त्र विभागात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे हे होते. या कार्यक्रमात सत्कारमूर्ती आदरणीय प्रा. मनोहर कबाडे सरांचा भौतिकशास्त्र विभागातर्फे शाल,हार, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. नितीन वाणी, भौतिकशास्त्र प्रमुख प्रा. पाटील वनिता व प्रा. सुप्रिया बिरादार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. मनोहर कबाडे यांनी सत्काराला उत्तर देताना संयम, त्याग, समाजासाठी काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले. सरांनी महाविद्यालयात ३५ वर्षे यशस्वी सेवा करून अतिशय आनंदाने सेवानिवृत्ती स्वीकारली आहे. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रो. डॉ. सिद्राम डोंगरगे सरांनी मा.प्रा. मनोहर कबाडे सरांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत बेंडगे यांनी केले तर आभार प्रा.सुप्रिया बिरादार यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रा.डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. एस. एम. पाटील, प्रा. नयने सर, प्रा.सुमित बिरादार, प्रा.डॉ. कोरे, प्रा.कांबळे सर, प्रा. दीक्षित मॅडम, प्रा. तपसाळे, प्रा. शेळके मॅडम, श्रीकांत उपासे, जगन्नाथ येंचेवाड, संजय गलगले आदी मान्यवर उपस्थित होते

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विविध मागण्यांचे निवेदन



**वाडा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष कांतिकुमार ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली व वाडा शहर शाखेच्या वतीने सोमवारी (दि.२५) पोलीस ठाणे, वाडा नगरपंचायत, तसेच वाडा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. तालुक्यातील फक्त शेतकऱ्यांनाच शेतमाल विक्रीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, भिवंडी- वाडा, वाडा-मनोर महामार्गालगत उभ्या राहणाऱ्या खाजगी कंपनीच्या कर्मचाऱ्यांची वाहतूक करणाऱ्या गाड्यावर कारवाई करावी अशा मागण्या केली आहे. तसेच वाडा शहरातील गणेश मैदान येथे ३ मे रोजी महाआरती चे आयोजन केले असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. याप्रसंगी महिला आघाडी तालुका अध्यक्ष उषा मोरे, तालुका संघटक संतोष भोमटे, तालुका सहसचिव सतीश पाटील, शहर अध्यक्ष जितेश किणी, विभाग अध्यक्ष स्वप्नील मोरे, शहर उपाध्यक्ष जयेश डेंगाने, मनविसे शहर अध्यक्ष हेमंत जाधव, शहर संघटक मधुर म्हात्रे, शहर सचिव विपुल आंबेकर, विभाग अध्यक्ष प्रशांत पाटील, शहर उपाध्यक्ष मंगला निकम, करण यादव व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वाड्यात राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन संपन्न

**वाडा/प्रतिनिधी**

साहित्य कला विचार मंचच्या वतीने रविवारी वाड्यातील पी.जे.हायस्कूल येथील के.डी. गंधे सभागृहात राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन २०२२ उत्साहात पार पडले. महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयातून गंधे सभागृहापर्यंत जि. प. शाळा गातेस बु.च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या बँड पथकाच्या व दिंड्या पताकांच्या जल्लोषात ग्रंथ दिंडीने साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षा, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योतीताई ठाकरे यांच्या समवेत राज्यभरातील विविध साहित्यिकांच्या उपस्थितीने सुरुवात झाली. कलाकारांच्या चित्रप्रदर्शनाचे छायाचित्रकार संजोग पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी जयवंत वाघेरे, अनिल ठाकरे, विनय पाटील, रूपेश वझे, ऊर्मिला दुरगुडे, धर्मेश सोंडागर, प्रफुल्ल घरत, मनोज पाटील, श्रद्धा जोगमार्ग, कैलास लहांगे, विजय जोगमार्गे आदी सहभागी झाले होते. प्रारंभी दीप प्रज्वलनाने व सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. नामवंत व प्रथितयश साहित्यिक श्रीकांत पाटील यांनी अध्यक्षस्थान भूषविले. व्यासपीठावरील मान्यवरांच्या उपस्थितीत शरद पाटील, नटराज मोरे, श्रीनित्यानंदभक्त रामुकाका, बबन शिंदे- बालसाहित्यिक, कवयित्री डॉ. प्रज्ञा पंडित, कुणबी समाज मंडळाचे मोहन पाटील, साहित्यिक परशुराम आंबी, कुणबी समाज मंडळाचे संतोष वेखंडे आदी उपस्थित होते. गातेस बु.च्या विद्यार्थ्यांनी गीतगायन केले. अस्पी विद्यालय उचाट यांच्या सौजन्याने शिक्षकरत्न दिलीप पुंडलिक पाटील, मुख्याध्यापक, माध्य.विद्यालय अबिटघर, शिक्षकरत्न-बी. के. पाटील, क्रीडा शिक्षक, पी.जे. हायस्कूल वाडा तसेच समाजरत्न अशोक पाटील, माजी केंद्रप्रमुख यांना पुष्प, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

02 TO 08 MAY 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 30/04/2022 8:37 PM Page 1



# देवणी पोलीस प्रशासनाकडून जामा मस्जिदमध्ये ईफ्तार पार्टी आणि शांतता समीतीची बैठक संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील पोलिस प्रशासनाकडून मंगळवारी जामा मज्जिद देवणी येथे पवित्र रमजान महिन्यातील उपवास असलेले मुस्लिम बांधवाना इफ्तार पार्टी देण्यात आली करोणामुळे गेल्या दोन वर्षापासून खंडित झालेल्या इफ्तार पार्टीचे नियोजन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश सोडारे, व त्यांच्या सहकार्याच्या वतीने करण्यात आली तसेच शांतता कमिटीची बैठक हि घेण्यात आली सदर बैठकीस राजकीय पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी असे २०० ते २५० नागरिक उपस्थित होते. बैठकित रमजान ईद व येणारे सन उत्सव शांततेत पार पाडण्याचे आव्हान केले बैठक शांततेत पार पडली. यावेळी पवित्र रमजान महिन्याचे महत्व रोजा करण्यासाठी काय करावे का करावा त्याचा परिणाम काय आहेत आजान कशा करता करण्यात येते त्याचा अर्थ काय आहे या सर्व गोष्टी बद्दल माहिती मुजीब मोमीन यांनी माहिती सांगितले. कार्यक्रमास बस्वराज पाटील, यशवंत पाटील, श्रमिक हक्क अभियानाचे राष्ट्रीय डायरेक्टर ज्ञानेश्वर भाऊ सुर्यवंशी, सय्यद अखील, देविदास पतंगे, जावेद तांबोळी, नगरसेवक अनिल इंगोले, परविन बेळ्ळे, नदिम मिर्झा, डॉ.संजय घोरपडे, महादेव मळभागे, अमरदीप बोरे, फय्याज शेख, जिलानी मामू, सलीम उटवाले, सोमनाथ लदे, मयूर पटणे, रेवन मळभागे, आनंद जीवने, अनिल कांबळे, रणदिवे लक्ष्मण, पांडुरंग कदम, इस्माईल शेख, पोलीस कर्मचारी अक्रम शेख, बी.के. रामशेट्टी, व्यंकट नळगिरे, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा पोलीस अधीक्षक निखळ पिंगळे यांच्या हस्ते सत्कार



**लातूर/करकरे आंबादास**

लातूर जिल्हा पोलीस दलामध्ये प्रदीर्घ सेवा बजावून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या तीन पोलीस अमलदार व एक पोलीस अधिकारी यांचा सत्कार पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांच्या हस्ते करण्यात आला. सेवानिवृत्त होणाऱ्या मध्ये पोलीस उपनिरीक्षक व्यंकट तुकाराम पडीले, सहाय्यक फौजदार राम भगवान निकम, सुरेश गुंडेराव कुलकर्णी, वेंकट मारुती वंजारे यांचा शाल, श्रीफळ व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. पोलिस अधीक्षकांनी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलीस कल्याण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे, पोलीस अमलदार बिराजदार व इतर अधिकारी, अमलदार उपस्थित होते.

# आजी-माजी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी आदिवासी सेवक गंगाधर म्हात्रे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**वसई/प्रतिनिधी**



शासनाचा आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त वसईतील आदिवासी सेवक गंगाधर म्हात्रे हे आपल्या भावाच्या खुनाचा खटला गेली ३४ वर्षापूर्वी एकहाती लढत आहेत. आरोपी, पोलीस आणि शासकिय यंत्रणेविरोधात लढा देताना त्यांच्यावर अनेकदा हल्ले झाले. तरिही त्यांनी खटला चालूच ठेवल्यामुळे हा खटला अंतिम टप्प्यात आलेला असताना, त्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याची भिती व्यक्त करून त्यांनी पोलीस संरक्षण मागितले होते. ते काही काळ देण्यात आल्यानंतर संरक्षण काढून घेण्यात आले. त्यासाठी पाठपुरावा केल्यावर कोर्टात जाण्यासाठी संरक्षण देण्याची विचित्र अट पोलिसी प्रशासनाने त्यांना घातली. तसेच राष्ट्रीय अनुसूचित जन जाती आयोग यांनी महसूल, पोलीस, गुन्हे अन्वेषण विभागाच्या आजी-माजी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती, पालघर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पोलीस उपमहानिरीक्षक कोंकण परिक्षेत्र यांच्या आदेशाला केराची टोपली दाखविली आहे. अशा या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे हे धनदांडगे आरोपी मला न्याय मिळू देत नाहीत व स्वत:ला वाचवित आहेत, दारोदारी जाऊन देखील मला अजूनपर्यंत न्याय मिळाला नाही, तरी आपण राज्याचे मुख्यमंत्री असल्याकारणाने आपण मला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी आदिवासी सेवक गंगाधर म्हात्रे यांनी मुख्यमंत्र्यांना केली आहे.

या खटल्यात धनदांडग्या आरोपींना पोलीस, सीआयडी आणि महसुल खाते पाठीशी घालीत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे संबंधितांकडून त्यांच्या जिवाला धोका असून, माझा खून करण्याची शक्यता असल्यामुळे २४ तास संरक्षणाची मागणी केली होती. या प्रकरणी प्रशासन न्याय मिळवून देण्यात अपयशी ठरल्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना त्यांनी साकडे घातले आहे. माझ्या केसबाबत राज्यपालांनी गंभीरतेने विचार करून, ज्यांनी ज्यांनी तपास कार्यात फसवणूक केली त्यांची चौकशी करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी गंगाधर म्हात्रे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

पान १ वरून...

## मोबाईलवर जास्त बोलल्याने आला...

आला आहे. मोबाइलवरून जास्तवेळ बोलण्याच्या वादातून एका मित्राने दुसऱ्या मित्राच्या डोक्यात दगड टाकून हत्या केल्याचे उघडकीस आले आहे.समसूल हक गुलाम करीम, असे अटक आरोपीचे नाव आहे. माहिती देताना पोलीस उपायुक्त दारूची पार्टी करण्याच्या बाहण्याने नेऊन केली हत्या. मृत प्रसाद हा बदलापूर पूर्वेकडील सापेगाव परिसरात असलेल्या पोतदार सोसायटीत कुटूंबासह राहत होता. त्याच सोसायटीमध्ये आरोपी समसूलही पत्नी व दोन मुलासह राहतो. त्यामुळे दोघांची मैत्री होती आणि दोघेही पेंटरची कामे करत होते. त्यातच (दि. २४ एप्रिल) रविवारी आरोपी मित्राच्या मोबाइलवरून मृत प्रसाद बराच वेळ बोलत होता. त्यावेळी आरोपीने त्याला माझ्या मोबाइलवरून बोलू जास्त नकोस म्हणून वाद घातला. त्यानंतर मृत प्रसादला दारूची पार्टी करण्याच्या बाहण्याने रविवारी रात्रीच्या सुमारास सोबत नेले. त्यानंतर आरोपी समसूलने प्रसाद डोक्यात दगड घालून त्याची हत्या करून फरार झाला.हत्या करून आरोपी पळाला होता आंध्रप्रदेशला-दरम्यान, सोमवारी (दि. २५ एप्रिल) रोजी दुपारच्या सुमारास जुवेलीकडून चामटोली गावाकडे जाणाऱ्या पुलाच्या बाजूला असलेल्या मोकळ्या मैदानात प्रसादचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच बदलापूर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी उल्हासनगरमधील शासकीय रुग्णालयात रवाना केला. याप्रकरणी बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात अज्ञात मारेकऱ्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला. पोलिसांचा तपास सुरू असतानाच गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, घटनेच्या रात्री दोघे मित्र सोसायटीमधून सोबत गेले. त्यानंतर आरोपी तेव्हापासून बेपत्ता असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाचे चक्र वेगाने फिरवत आरोपीचा ठावठिकाण शोधून काढला असता आरोपी आंध्रप्रदेशमध्ये असल्याचे समजले.७२ तासात आरोपी गजाआड - त्यानंतर बदलापूर पोलिसांचे पथक आंधप्रदेशला रवाना झाले. मात्र, पोलीस पथक आंध्रप्रदेशला पोहोचल्यानंतर आरोपी पुन्हा कल्याणच्या दिशेने येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलीस पथकही आंध्रप्रदेशमधून तातडीने कल्याणाला रवाना होत आरोपीला कल्याण रेल्वे स्थानक परिसरातून ७२ तासाच्या आत अटक केली आहे.

## आईवरच्या रागाची तिच्या मुलाला...

मुलाची आई आणि कांचन सिंग हे दोघेही एका बिस्किटाच्या कारखान्यात एकत्र कामाला होते. १६ एप्रिल रोजी कांचनसिंग आणि मृत मुलाची आई यांच्यात किरकोळ कारणावरून भांडणं झाली.यानंतर २० एप्रिल रोजी कांचनसिंग याने साडेचार वर्षाच्या या चिमुकल्याला आईस्क्रीम देण्याच्या बहाण्याने आपल्या सोबत नेलं आणि अंबरनाथच्या ऑर्डनन्स फॅक्टरी परिसरात एका झाडाझुडपात नेऊन त्याची गळा दाबून हत्या केली. यानंतर त्याचा मृतदेह तिथेच टाकून कांचनसिंग हा उत्तर प्रदेशात त्याच्या मूळगावी जाण्यासाठी रवाना झाला. इकडे मुलगा बेपत्ता झाल्याने मुलाच्या आई-वडिलांनी उल्हासनगर पोलीस ठाण्यात मुलगा हरवल्याची तक्रार दिली. तर दुसरीकडे अंबरनाथ पोलिसांना एका लहान मुलाचा मृतदेह ऑर्डनन्स परिसरात आढळून आला. हा मृतदेह अपहरण झालेल्या मुलाचाच असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी तपासाला सुरुवात केली.ज्यामध्ये मुलाच्या आईचं आरोपी कांचनसिंग याच्यासोबत ४ दिवसांपूर्वी भांडण झाल्याचं समोर आले आहे. यामुळे पोलिसांनी कांचनसिंगचा शोध घेतला असता तो उत्तर प्रदेशात निघाल्याचे पोलिसांनासमजले आहे.

त्यामुळे उल्हासनगर पोलिसांच्या टीमने उत्तर प्रदेशात जाऊन प्रयागराज इथून कांचनसिंग पासी याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने आपणच या साडेचार वर्षाच्या मुलाचा गळा दाबून खून केल्याची कबुली पोलिसांना दिली. त्यानुसार त्याच्याविरोधात अपहरण, हत्या आणि पुरावे नष्ट करण्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. त्याला सध्या ३० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त डॉ. सुधाकर पठारे यांनी दिली आहे.

## पत्नीचा राग त्याने सासऱ्यावर काढला...

तू बघत नाहीस असे म्हणून तिच्याबरोबर भांडण काढत होता. तो दारू पिऊन आला की पिसाळल्या गत करीत होता. बायकोला मारहाण करून तिला अर्वाच्च भाषेत शिव्या ही देत होता. तिच्या माहेरच्या लोकांचा उद्दार करीत नको नको ते तिला बोलत होता. सुरूवातीला ती त्याला काही एक बोलत नव्हती. त्याचा मार ती गप्पगुमान सहन करीत होती. त्याचे हे कायमचेच झाल्यावर तिच्या ही सयंमाचा बांधा फुटला होता. सासरी आपल्या सासरा नवरा सासू कडून कसा आणि किती त्रास होत आहे याची माहिती तिने आपल्या माहेरच्या लोकांना दिली होती.

घर ते संसार असतो संसार म्हटला की भांडयाला भांडे लागते आणि त्याचा आवाज हा होतोच हे तिच्या आई वडिलांना ही माहित होते म्हणून त्यांनी जावाई निलेशला आपल्याकडे बोलावून समजावून सांगितले होते. त्यावेळी त्याने मी सरळ वागेन आणि बायकोला ही सांभाळेन असे सासरा गजानन पवार यांना सांगितले होते. त्यावेळी काही महिने तो गप्प बसला होता. त्यानंतर ही तो त्याच्या घरचे आई वडिल हे शेंवताला घालून पाडून बोलत होते. त्याचे मागचे तसे पुढे चालू झाले होते. आता तर ते शेंवताला तुझ्या माहेरकडून हे आण ते आण म्हणून त्रास देवू लागले होते. तुझ्या बापाने लग्नात आम्हाला काहीच दिले नाही साधा मान पान ही केलेला नाही त्यामुळे आमच्या मुलाची हौस मौज मजा काही मनासारखी झाली नाही असे ते तिला डिवचून बोलत होते. सासरी तिला त्रास हा होत होता. हे तिच्या आई वडिलांना माहित होते. बऱ्याचवेळेला नवरा बायकोची भांडणे ही पंचासमोर ही मिटविण्यात आली होती. तरीही जावाई काही सुधारायची चिन्हे दिसत नव्हते. निलेश हा दारु पिऊन येवून बायकोला मारहाण करीत होता.त्याच्या या त्रासाला कंटाळून गेल्या चार पाच महिन्यापूर्वी शेंवता ही आपल्या माहेरी आई-वडिलाकडे निघून गेली होती. मध्यतंरी निलेश हा तिला आणायला ही गेला होता. पण त्यावेळी तिच्या आई वडिलांनी आणि तिने त्याला अनेक अटी घातल्या होत्या. तसेच मुलीला चांगले वागवतो असे लिहून दया असे जावायला तिच्या आई वडिलांनी सांगितले.या गोष्टीला तो तयार नव्हता. तसे ही त्याने बायकोला एकांतात भेटून तू चल सासरी माझ्याबरोबर, घरच्या लोकांचे काय एवढे मनावर घेवू नकोस. असे सांगूनही पाहिले होते. पण ती ही हेकेखोर आणि हट्टी असल्याने तिने त्याला मी माझ्या आई वडिलाच्या पुढे जाणार नाही असे सांगून त्याला परत पाठविले होते. त्यावेळी तो हात चोळीतच आपल्या गावाकडे परत निघून आला होता. तसे तो बायकोला नादांयला ये म्हणून सारखा मोबाईलवरून फोन करीत होता. ती मात्र त्याला वाटाण्याच्या अक्षता लावत होती. त्यामुळे तो तिच्यावर जास्तच चिडला होता. आपल्या बायकोला नांदायला पाठवून दयायला तिचे आई वडिलच तयार नाहीत असा समज त्याने करून घेतला होता.तसे तो सासरा गजानन पवार याना देखील सारखा फोन लावून बायकोला नांदायला पाठवून दया म्हणून सांगत होता.पण त्याच्या सासऱ्याचे सासूचे आणि बायकोचे मागचे तेच रडगाणे सुरू होते.म्हणून तो आता जास्तच त्याचेवर चिडला होता.

शनिवार दि.२३ एप्रिल रोजी तो दारू पिऊन सासरी पाथर्डी येथे आला. दिवसभर त्याची भांडणे ससू सासरा आणि बायकोबरोबर चालू होती. तो तिला नांदायला चल म्हणत होता.पण ती काही त्याचे ऐकत नव्हती. त्यामुळे त्याच्या रागाचा पारा चढला होता. संध्याकाळी सासरा हा शेतात वैरणीसाठी गेला रात्री उशिराच तो परत घराकडे आला. त्यावेळी जावाई हा घरात दारू पिऊन दंगा करीत होता. त्यांनी त्याला समजावून सांगून तू नीट वाग नाहीतर आम्ही तुझ्या बायकोला काही सासरी पाठवणार नाही असे निक्षून सांगितले. निलेश हा दारूच्या नशेत शिव्या देत त्याना मारहाण करायला जात होता. त्यावेळी शेजाऱ्यांनी भांडणे सोडवून घेतली होती. त्यांनी निलेश याला नीट वागण्याचा सल्ला दिला होता. सगळेजण आपल्यालाच दोषी धरत आहेत याचा राग त्याला आला होता. रात्री सगळेजण जेवून झोपले होते. परंतु त्याला झोप येत नव्हती. त्याला अजूनही दारूची झिंग होतीच तो विचार करीत होता. त्याचा सासरा गजानन पवार हा बाहेर अंगणात खाटेवर झोपला होता. याच्यामुळेच आपल्या जीवनाची वाट लागलेली आहे असा त्याने मनात विचार केला. याला चांगलाच धडा शिकविला पाहिजे असे म्हणत तो त्याचेजवळ गेला. ते गाढ झोपेत होते. निलेश हा काळ बनुनच त्याच्या जवळ गेला होता. त्यावेळी पहाटेचे ३.३० वाजले होते.ते झोपेत असल्याने कोणताच प्रतिकार करणार नाहीत याची त्याला खात्री होती म्हणून त्याने त्याच्या जवळ जात आपल्या खिशातील चाकू काढला आणि त्याच्या अंगावर सपासप असे वार केले. त्यासरशी गजानन पवार हे ओरडले. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने घरात झोपलेली त्याची मुलगी म्हणजे निलेशची बायको पळतच बाहेर आली. ती पाहते तर तिचा नवरा तिच्या वडिलाच्या अंगावर चाकूने वार करीत होता. तो परत त्याच्या अंगावर वार करीत आहे. हे पाहून तिने निलेशला प्रतिकार करीत बाजुला ढकलून दिले. त्यावेळी त्याने बायकोवर ही चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ती ही ओरडत होती. तिच्या ओरडण्याच्या आवाजाने आजूबाजूचे शेजारी जागे झाले. ते ही घटनास्थळाकडे येत असल्याचे पाहून निलेश हा तेथून पळून गेला होता. त्याच्या हल्ल्यात गजानन पवार हे गंभीर रित्या जखमी झाले होते. त्याची अवस्था ही नाजूक होती. त्याच्या अंगातून रक्ताच्या धारा लागलेल्या होत्या. हे बघून शेंवताने शेजाऱ्याच्या मदतीने त्यांना गावातीलच एका दवाखान्यात उपचारासाठी नेले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले.सकाळी या घटनेची माहिती तेल्हारा पोलीस स्टेशनला देण्यात आली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी आले. त्यांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी तेल्हारा येथील सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांना शेंवताने दिली. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी घडवली याचा अंदाज पोलीसांना आला होता. या घटनेनंतर संशयीत आरोपी निलेश धुरंदर हा पळून गेला होता. त्याचा शोध पोलीस घेत असताना तो खाटकी येथील एका दारूच्या दुकानात असल्याची माहिती पोलीसाना मिळाली. पोलीसांनी तेथून त्याला ताब्यात घेऊन तेल्हारा पोलीस स्टेशनला आणले. त्याचेकडे घडलेल्या गुन्हया विषयी विचारले असता तो पोलिसांना काहीच सांगू शकत नव्हता. कारण त्यावेळी देखील त्याने फुल्ल दारू पिली होती. त्याची दारू उतरल्यानंतर पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. मयत गजानन पवार याच्या मुलीने दिलेल्या फिर्यादीनुसार गजानन पवार याच्या खून प्रकरणी त्याचा जावाई निलेश धुरंदर याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला मा.कोर्टासमोर पोलीसांनी उभे केले असता मा. कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि रक्ताने माखलेले कपडे जप्त केले. या घटनेचा पुढील तपास उपविभीय पोलीस अधिकारी रितु खोकर याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी. ज्ञानोबा फड, पो.उप.निरी रमेश घामोडे, स्वप्नील सरोदे, योगेश उमक, राजेश्वर सोनोने, उमेश शिनगारे, अक्षय खोने, गजानन इंगळे, जयंत सोनटक्के, अनिल शिरसाठ यांनी केला. नवरा बायकोची भांडणे वेळत मिटली तरच संसार गोडी गुलाबीचा होत असतो. त्यातच बायको जर तिच्या माहेरकडच्या लोकांचे ऐकत असेल तर त्या संसाराचे वाटोळे व्हायला वेळ लागत नाही.त्यातूनच अशा खुनाच्या घटना घडतात हेच यातून दिसून येते.

## बेरोजगार अभियंत्याची शोकांतिका...

नातेवाईकांचा संशय बळावला. नातेवाइकांनी लगेच धंतोली पोलीस ठाण्यात याची माहिती दिली. धंतोली पोलिस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश चव्हाण हे आपल्या ताफ्यासह घटनास्थळी पोहोचले, घर आतून कुलूप बंद असल्यामुळे मुख्य दरवाजा तोडण्यात आलास त्यानंतर बेडरूममध्ये पोलीस गेल्यावर जे चित्र दिसलं ते थरकाप उडवणार होतं. दोघांचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आले. आईचा चाकूने वार करून खून करण्यात आला होता. तर श्रीनिवासने विष प्राशन करून आत्महत्या केली होती. श्रीनिवास आणि त्याच्या आईचा मृतदेह हा चार ते पाच दिवसांपूर्वीचा असून कुजलेल्या परिस्थितीमध्ये बेडरूममध्ये आढळून आला. श्रीनिवास याने आत्मघातकी पाऊल का उचलले याचा पोलीस तपास करत असून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी नागपूरच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयामध्ये पाठवण्यात आले आहे. मात्र या घटनेनंतर नातेवाईक सुन्न झाले आहे. ही घटना २६ एप्रिलला उघडकीस आली असली तरी तीन ते चार दिवस आधी श्रीनिवासने हत्या करून स्वतः आत्महत्या केली. श्रीनिवास हा मानसिक तणावात असावा. त्याच्या डोक्यात वारंवार आत्महत्येचा विषय विचार येत असावा. आपण आत्महत्या केल्यानंतर आपल्या वयोवृद्ध आईचे काय होईल या भीतीपोटी त्याने आधी आईला संपलं आणि त्यानंतर आत्महत्या केली असावी अशी शक्यता देखील वर्तवली जात आहे. या प्रकरणाचा पोलीस अधिक तपास करत आहे.

पान ८ वरून...

## जीवनात आनंद मिळेल असे काम...

तुमच्या आवडीचे क्षेत्र निवडा आणि त्यात काम करा, असे त्यांनी शेवटी सांगीतले. यावेळी बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, निर्धार, समर्पन आणि प्रेम हे गुण एम.बी.बी.एस. सारखी कठीण पदवी मिळविण्यासाठी महत्त्वाचे ठरतात. एखाद्या कामाच्या सरावातून माणूस पारंगत होतो. हे सातत्याने करण्यासाठी रुग्णसेवेवर भर द्यावा. रुग्णसेवेतून अनेक गोष्टींचे शिक्षण मिळवून वैद्यकीय सेवेत पारंगत होता येते. प्रामाणिकपणे रुग्णसेवा दिल्यास त्यातून आनंद, प्रसिध्दी आणि अर्थप्राप्ती होते. वैद्यकीय शाखेत २५ टक्के शिक्षण हे शिक्षकांकडून, २५ टक्के स्वयं अध्ययनातून, २५ टक्के रुग्णसेवेतून तर २५ टक्के ज्ञान येणाऱ्या काळात मिळते. डॉक्टर हा वैद्यकीय शाखेचा तज्ज्ञ म्हणून २० टक्के तर माणूस म्हणून ८० टक्के योगदान देत असतो असे डॉ. कराड म्हणाले. यावेळी बोलताना डॉ. हनुमंत किनिकर म्हणाले की, माईर्स एमआयटी या संस्थेमुळे हजारो डॉक्टर घडले असून ते आज देश, विदेशात सेवा देत आहेत. आजचे युग हे सुपरस्पेशालिटीचे असल्याने त्यादृष्टीने वाटचालीसाठी प्रयत्न करावेत. शिवाय वैद्यकीय सेवे बरोबर संशोधनाकडे लक्ष केंद्रित करावे. रुग्ण, नातेवाईकांशी संवाद ठेवून प्रामाणीकपणे रुग्णसेवा करावी. लातूर येथे आजही किडनी, लिव्हर, हृदय प्रत्यारोपन सुविधा उपलब्ध नाही. ही सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे किनिकर म्हणाले. यावेळी बोलताना डॉ. विठ्ठल लहाने म्हणाले की, जो माणूस जीवनात कामाचा आनंद घेतो तो चांगला जगतो. वैद्यकीय शिक्षणात घातलेला वेळ हा रुग्णांचे दु:ख दूर करतो. या जगात अनेक चांगले लोक आहेत. आपण चांगले होणे गरजेचे आहे. आपल्यासाठी जगातली सर्वात मोठी माणसे ही आपले आई - वडिल असतात. वाईट काळात तेच आपल्या पाठीशी खंबीर उभे राहतात असे डॉ. लहाने म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. अशोक आरदवाड म्हणाले की, एम.बी.बी.एस. ची पदवी पुर्ण करणे हा आयुष्यातील मोठ्ठा टप्पा आहे. या आनंदामागे आई - वडिल आणि गुरुजन आहेत. त्यांना विसरु नका. वैद्यकीय शिक्षणात खुप वेळ जातो आणि पुढील आयुष्य रुग्णसेवेत जाते. डॉक्टरचे आयुष्य खडतर आणि समाजसेवेचे आहे. त्याचा आनंद घ्यावा असे डॉ. आरदवाड म्हणाले. यावेळी बोलताना डॉ. चिंते म्हणाले की, एम.बी.बी.एस. नंतर पुढे पीजी करुन डॉक्टरच व्हावे असे नाही तर इतर मार्ग निवडून यशस्वी होता येते. सध्या जगाला मानवी मुल्य देण्याचे काम भारत करीत असल्याचे ते म्हणाले. यावेळी एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयातील 'एम.बी.बी.एस. स्पंदन २०१६' या बॅचच्या पदवीधरांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी डॉ. हनुमंत कराड यांनी पदवीप्रदान विद्यार्थ्यांना आरोग्य सेवेची शपथ दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय काठोळे, डॉ. पराग टिपरे, डॉ. गायत्री सुर्वे, डॉ. श्रध्दा गरकल यांनी केले तर आभार डॉ. नम्रता गुर्ले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## पोलिसांची परवानगी घेऊनच धार्मिक...

परवानगी असणे गरजेचे आहे. त्यामुळे लातूर पोलिस प्रशासन सगळ्यांना आवाहन करत आहे की, कुठलेही धार्मिक स्थळ असतील प्रार्थनास्थळ असतील जसे जैन मंदिर, चर्च, मंदिर, बुद्ध विहार, मज्जिद, ईदगाह मैदान अशी कुठल्याही प्रकारचे धार्मिक स्थळातील स्पीकर लावण्यासाठी पोलिसांकडील उपलब्ध परवाना फॉर्म भरावा. त्यांना पोलिस प्रशासनाच्या वतीने स्पीकर, भोंगा वाजवण्यासाठी नियम व अटी च्या अधीन राहून परवानगी देण्यात येणार आहे. त्याच्यासाठी एकच गोष्ट आवश्यक आहे ती म्हणजे संबंधितांनी परवानासाठीचा फॉर्म मधील माहिती व्यवस्थित भरून पोलीस प्रशासनाकडे द्यायची आहे. पोलीस तात्काळ त्या अनुषंगाने त्यांची परमिशन सर्वांना देणार आहेत. संबंधितांनी जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये सदर चा फॉर्म भरून दिल्यास त्यांना परमिशन देण्यात येईल एका विशिष्ट समाजाच्या एखाद्या प्रार्थनास्थळ आला परमिशनची आवश्यकता असेल किंवा स्पीकरची आवश्यकता भासेल असे नसून सर्वच प्रकारच्या धार्मिक प्रार्थना स्थळांना स्पीकर भोंगा परवान्याची आवश्यकता भासणार आहे. तरी संबंधितांनी जवळच्या पोलीस ठाणे मधून तात्काळ परमिशन मिळवून घ्यावी असे. आवाहन लातूर जिल्हा पोलीस दलाकडून करण्यात येत आहे.

## गंगापुर सोसायटीवर खंदाडे पॅनल...

महत्त्व लक्षात घेऊन काँग्रेस च्या दिग्गजांकडून लक्ष घालण्यात आले तरी सुध्दा गंगापुर गावामधील लोकांनी बाबु हणमंतराव खंदाडे यांच्यावर पुर्ण विश्वास दाखवला, काल दि २८/०४/२०२२ रोजी आठ ते चार या वेळेत मतदान प्रकीया पार पडली. कालच सायकांळी मतमोजणी पार पडली. निवडणुक मतमोजणीनंतर गावातुन विजयी मिरवणुक काढण्यात आली.

या निवडणुकीत परत एकदा खंदाडे गटाने वर्चस्व राखले. सर्व विजयी उमेदवाराचे स्वागत आबासाहेब शिंदे, उपसरपंच रफीक शेख, माजी व्हाईस चेअरमन बाबुलाल शेख, शिवाजी दंडीमे, ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब मिंड, ईश्वर शेलार, प्रभाकर वाघमारे, अनिल पुजारी, ज्ञानोबा तळेकर, प्रभाकर तळेकर, सुर्यभान मस्के, किसन तळेकर, सिकंदर शेख, चॉद शेख, गोविंद कुकडे, प्रभाकर भाग्यवंत, बाळु चलवाड, भगवान वाघमारे, योगेश फुटाणे, राहुल बनसोडे, सतिष मस्के, गोपाल कुकडे, सिद्राम राऊत, विनोद दंडीमे, निंगराम दंडीमे, नारायण दहीवाले, विकास शिंदे, मंगेश खंदाडे, प्रताप शिंदे, रामेश्वर शिंदे, सोपान दंडीमे, जगन्नाथ पुजारी गोविंद पुजारी, काशिनाथ राऊत, गजानन तळेकर, विष्णुदेव चामे, भैय्या मिंड, महादेव गायकवाड, माणिक बनसोडे आदि जणांन स्वागत केले.

02 TO 08 MAY 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 30/04/2022 8:37 PM Page 1



# जगभरातील बदल व क्रांत्या युवकांनी घडवल्या -प्रो.डॉ.शिवराज बोकडे



**लातूर/प्रतिनिधी**

जगभरातील सर्व तऱ्हेची विधायक बदल आणि अनेक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय क्रांत्या ह्या युवकांनी घडविल्या आहेत असे प्रतिपादन नांदेड येथील यशवंत महाविद्यालयातील इतिहास विभागाचे अभ्यासक तथा माजी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, स्वा.रा.ती.म.वि., नांदेडचे प्रो. डॉ. शिवराज बोकडे यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभाग व मराठी विभागाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य अमृत महोत्सवाचे औचित्य साधून भारतीय स्वातंत्र्य संग्राम आणि हैद्राबाद मुक्ती लढा या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. सिद्राम डोंगरगे होते. तर विचारपीठावर अमृत महोत्सव समितीचे समन्वयक डॉ.श्रीकांत गायकवाड, खटउ समन्वयक डॉ. कॅप्टन बाळासाहेब गोडबोले, सिनेट सदस्य डॉ. दीपक चाटे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ.विनायक वाघमारे, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने व जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमापूजनाने झाली.

पुढे बोलताना प्रो. डॉ.बोडके म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील हैदराबाद मुक्तिसंग्राम हा एक रोमांचकारी असा लढा आहे. या लढ्यामुळे संपूर्ण स्वातंत्र्याचे स्वप्न पूर्ण होऊन अखंड व एकात्म भारताची निर्मिती झाली. भारतीय स्वातंत्र्याप्रमाणे हैदराबाद मुक्तीलढा हा जुलमी प्रवृत्तीच्या विरोधात दिलेला लोकलढा होता. देशाला मिळालेले स्वातंत्र्य समर्पित भावनेने कार्य केलेल्या सर्व हुतात्मे, सविनय कायदेभंग, असहकार चळवळ, भूमीगत चळवळी, सशस्त्र लढे, छोडो भारत, करा किंवा मरा या अनेकविध चळवळी व धुरंदर नेतृत्वामुळे मिळालेले आहे. युवकांनी हे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न करावेत. कारण युवकच या देशाचे आधारस्तंभ व भविष्य आहेत, असेही ते म्हणाले. आपल्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. डॉ. सिद्राम डोंगरगे म्हणाले की, भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असून सर्व प्रादेशिक, भाषिक, धार्मिक भेदभाव विसरून विविधतेत एकता हे भारतीय संस्कृतीचे निराळेपण आपण सर्वांनी जपले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा संपूर्ण इतिहास विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक शाळा, महाविद्यालयातून शिकविला गेला पाहिजे. जे लोक आपल्या देशाचा इतिहास विसरतात त्या देशाचे भवितव्य अंधारात असते. मी जन्माने भारतीय आहे व अंतिम ही भारतीय आहे हे बाबासाहेबांचे सूत्र लक्षात घेऊन तरुणांनी देशसेवेसाठी अहोरात्र कष्ट केले पाहिजे. तरच देश सर्व प्रकारे प्रगती करु शकेल. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर मनोगत डॉ.बाळासाहेब गोडबोले व्यक्त केले,सूत्रसंचालन प्रा. शंकर भोसले यांनी केले. उपस्थितांचे आभार प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनायक वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. संजय गवई, डॉ. मनोहर चपळे, डॉ. भास्कर नल्ला रेड्डी, डॉ. जे.एच. देशमुख, डॉ. एम.बी. स्वामी, प्रा. धोंडीबा भुरे, प्रा. हरिभजन कांबळे, प्रा. शिवेश्वर मुचाटे आदी प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी डावकरे, रघुनाथ शिंदे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोरोना समूह संसर्ग रोगाचे प्रतिबंधक नियमांचे पालन करण्यात आले. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# भिवंडीतील सविता जगताप मार्केट बनले अवैध व्यवसाय व जुगाराचा मोठा अड्डा!

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील मध्यवर्ती भागात नजराणा टॉकीज जवळ असलेल्या स्व.सविता जगताप मार्केट मध्ये दारूविक्री, मटका, जुगार, अंमली पदार्थाचे सेवन दिवसाढवळ्या होत असून याकडे पालिका प्रशासनाचे व मार्केट विभागाचे दुर्लक्ष असून पोलिसांनी देखील याकडे कानडोळा करत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. तसेच या मार्केट समोरून शाळेची मुले जात असल्याने पालकांनी देखील चिंता व्यक्त केली आहे. भिवंडी महानगरपालिका झाल्यानंतर शहरातील नागरिकांसाठी अद्यावत मार्केट बांधू शकली नाही. त्यामुळे शिवाजीनगर ते ठाणगेआळी भागात रस्त्यावर मार्केट भारत आहे. या मार्केट मध्ये रात्रंदिवस खरेदी-विक्री सुरु असल्याने या भागातून चारचाकी वाहने जाऊ शकत नाही. त्यामुळे रस्त्यावरील मार्केट बंदिस्त जागेत नेण्यासाठी पालिकेच्या मार्केट विभाग, बांधकाम विभाग व प्रशासनाने नाल्याच्या स्लॅबवर शेकडो गाळेअसलेले मार्केट बांधले. या मार्केटला दहावर्षा पेक्षा जास्त कालावधी होऊनही येथे भाजी विक्रेत्यांना बसविण्यात पालिकेला अपयश आले. त्यामुळे या मार्केटचा ताबा काही महिन्यापासून अवैध व्यावसायिकांनी घेतला आहे.या मार्केटमद्धे, दारू विक्री, जुगार, मटका आणि अमली पदार्थाचे सेवन



मोठ्या प्रमानात केले जात आहे. तर या मार्केजवळ एक जुगाराचा अड्डा देखील चालत आहे. हा अड्डा बंद करण्यासाठी व त्यावर कारवाईसाठी नागरिकांनी वारंवार अर्ज सुद्धा केले आहेत. परंतु निजामपूर पोलिस ठाण्याचे पोलीस याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे. लाखो रुपये खर्च करून बांधलेल्या मार्केटमद्धे अवैध व्यवसाय सुरु असताना पालिकेच्या मार्केट विभागाचे अधिकारी आणि प्रभाग सामिती ५चे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप परिसरातील नागरिक करीत आहेत. सध्या पोलीस फिरून फिरून मटका, जुगार आणि अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई केली जात असताना स्व. सविता जगताप मार्केटमध्ये सुरु असलेल्या अवैध व्यवसायाकडे मात्र दुर्लक्ष कां करीत आहे? हा प्रश्न परिसरातील नागरिक व महिला करीत आहे हे अवैद्य धंदे बंद होणार की नाही असा सवाल नागरिकांकडून करण्यात येत आहे

# कशेळी ते अंजूरफाटा दरम्यान गाड्यावर खुलेआम अवैधरित्या दारू विक्री

**भिवंडी/प्रतिनिधी**

तालुक्यातील कशेळी ते अंजूरफाटा दरम्यान मोठ्या प्रमाणात ढाबे, चायनीस गाड्या, वाईन शॉप समोर गाड्यावर खुलेआम अवैधरित्या दारू विक्री आणि पिणे करण्यात येत असल्याने शासनाचा



महसूल भरून अधिकृत व्यवसाय करणाऱ्या बार चालक-मालकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याने कशेळी-अंजूरफाटा दरम्यान असलेल्या बार आणि देशी बार हॉटेल मालक-चालक संघटनाने भिवंडी उत्पादन शुल्क विभागाकडे लेखी निवेदन देऊन कडक कारवाईची मागणी केली आहे. मात्र यावर भिवंडी उत्पादन शुल्क विभाग काय कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे. त्याच प्रमाणे कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष प्रकाश प्रकाश उमराटकर यांनी मंगळवारी दिला आहे. कशेळी ते अंजूरफाटा दरम्यान एफएल ३ आणि सीएल २ लायसन धारक बार आणि देशी बार हॉटेलचा व्यवसाय चालक - मालक करीत असून शासनाचा महसूल रीतसर भरून अधिकृत व्यवसाय करीत आहे मात्र कशेळी ते अंजूरफाटा दरम्यान मोठ्या प्रमाणात ढाबे, चायनीस गाड्या, वाईन शॉप समोर गाड्यावर खुलेआम अवैधरित्या दारू विक्री पिणे होत आहे ह्या प्रकारामुळे बार, देशी बार हॉटेल व्यवसायात मोठ्या प्रमाणात तोटा सहन करावा लागत आहे, त्यामुळे लाखो रुपये खर्च करून शासनाला महसूल भरून आणि शासनाच्या नियमांचे पालन करून अधिकृत व्यवसाय करीत असताना देखील आम्हाला येथील अवैधरित्या सुरु असलेल्या ढाबे, चायनीस गाड्या, वाईन शॉप समोर गाड्यावर खुलेआम दारू विक्री पिणे मुळे व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर येत असल्याने संतप्त झालेल्या बार आणि देशी बार हॉटेल मालक-चालक संघटनाचे अध्यक्ष प्रकाश उमराटकर, उपाध्यक्ष कुलेश तरे, खजिनदार, गौरव पाटील, सचिव राज पाटील, अक्षय पाटील, रवि पाटील आदी उपस्थित होते. दरम्यान उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली नाही तर मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशारा संघटनेचे अध्यक्ष प्रकाश उमराटकर यांनी मंगळवारी दिला आहे. त्याच प्रमाणे अवैधरित्या सुरु असलेले दर्याकिनारा ढाबा, वांशिका ढाबा, चौपाटी ढाबा, आई बाबा ढाबा, गुड्डूचा ढाबा, मोरया ढाबा साई पूजा चायनीज, रॉयल चायनीज आशा अनेक ठिकाणावर खुलेआम मोठ्या प्रमाणात अवैधरित्या दारू विक्रीचा व्यवसाय आणि दारू पिणे होत असल्यामुळे कडक कारवाई करण्याची लेखी निवेदन देऊन मागणी केल्याची माहिती पत्रकारांना दिली आहे. याबाबत संबंधित ढाबा, चायनीस, मालकांशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

# चित्रकार विकास मल्हारा प्रतिष्ठेच्या टागोर अवॉर्डने सन्मानित




**जळगाव/प्रतिनिधी**

गतिशील मन, चित्रात मुक्त होऊन जातं, घडत जातं कळत नकळत आकारात किंवा निराकारात किंवा आपल्या मूळ अस्तित्वात... निरवतेत असे काव्यात्म सृजन लिहीणारे विकास मल्हारा यांना यंदाचा 'टागोर अवॉर्ड' रवींद्रनाथ टागोर विद्यापीठ भोपाळ द्वारा आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रतिष्ठेच्या पुरस्काराने नुकतेच भोपाळ येथे सन्मानित करण्यात आले. रु.५०,०००/-, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. जैन इरिगेशनच्या कला विभागात कार्यरत असलेले विकास मल्हारा यांना प्रख्यात चित्रकार व लेखक अशोक भौमिक व कुलगुरू लेखक संतोष चौबे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संपूर्ण भारतातून आलेल्या २००० कलाकृतींतून अंतिम पाच पुरस्कारात त्यांच्या क्रॅलिक व चारकोलसह पेपर या माध्यमात केलेल्या अनटायटल्ड-३ या चित्राची निवड झालेली होती. पाश्चात्य कला क्षेत्रातील १९ व २० व्या शतकातील कलावाद ते समकालीन कला अशा विविध कला प्रवाहांच्या सखोल अभ्यास, चिंतनशीलतेतून विकास मल्हारा यांनी आपली स्वतःची अमूर्त कलाशैलीचा शोध व अभ्यास करीत असावे. त्याला कबीर, सुफी, ओशो साहित्याची जोड दिली. अंत:प्रेरणा आणि स्वत: जगण्यातील अनुभव यांची सरमिसळ त्यांनी आपल्या चित्रकलेतून केली. या अतरंगी अंतरंगातून भावनांचा आवेग घेऊन माझे चित्र नकळत्या आभासी आकारातून उमलत जाते, माझी अमूर्त चित्रे म्हणजे माझे समर्पण होय. त्यांच्या अशा समर्पित चित्रावकाशात मातकट, काळपट आणि करड्या रंगाचा संयमित उत्सव असतो. रंग आकारांच्या संगतीला रेषांचा अनवट साज असतो. पद्मश्री भवरलालजी जैन यांचा आशीर्वाद, जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांचे प्रोत्साहन, अमूर्त चित्रकार गुरुवर्य प्रभाकर कोलते व चित्रकार वासुदेव कामत यांचे मार्गदर्शन नेहमीच त्याच्यासाठी उर्जास्रोत आहे. चित्रकार प्रकाश वाघमारे, जेष्ठ रंगकर्मी शंभू पाटील, प्राचार्य राजेंद्र महाजन, चित्रकार राजू बाविस्कर यांच्यासह कलाप्रेमींनी विकास मल्हारा यांचे कौतूक केले आहे.

# सनदी लेखापालांच्या राज्यस्तरीय समितीवर सीए विशाल चव्हाण यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी**



द इन्स्टिट्युट ऑफ चार्टड अकाउंटंटस ऑफ इंडिया (ICI) च्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (WIRC) च्या राज्यस्तरीय समितीवर सीए विशाल चव्हाण यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या तीन राज्यांमधील सीएंसाठी काम करणारी ही समिती असून या निवडीबद्दल वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे चेअरमन मुर्तुझा कांचवाला, व्हाईस चेअरमन यशवंत कासार, केंद्रीय परिषद सदस्य मंगेश किनारे यांनी सीए विशाल चव्हाण यांचे अभिनंदन केले आहे. सीए विशाल चव्हाण यांनी आयसीएआयच्या लातूर शाखेचे अध्यक्ष म्हणून २०२१-२२ या काळात काम पहिले आहे. त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात लातूर शहरातील सीए सदस्य व त्यांच्या परिवारातील सदस्यांसाठी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण, सीए दिनानिमित्त वृक्षारोपण, महिला दिनानिमित्त समाजातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार, सूक्ष्म-लघु आणि मध्यम उद्योगांमधील वाढत्या संधी यावर मार्गदर्शन तसेच सीए व्यवसायाची कोविड पश्चात भविष्यातील परिस्थिती यावर चर्चासत्राचे आयोजन करणे यांसारखे असंख्य कार्यक्रम राबवले आहेत. याची दखल घेत आयसीएआयने लातूर शाखेला प्रादेशिक स्तरावरील सर्वोत्कृष्ट शाखेचा पुरस्कार देखील प्रदान केला आहे. सीए विशाल चव्हाण यांनी त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात केलेल्या उल्लेखनीय कामांमुळे त्यांची राज्यस्तरीय समितीवर निवड झाली आहे. २०२२-२३ या वर्षासाठी ही निवड असून या निवडीबद्दल शहरातील सीए, सीए करणारे विद्यार्थी,व्यापारी तसेच समाजातील सर्वच घटकांमधून सीए विशाल चव्हाण यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**

उन्हाळ्यातील सुटीतील फुरसतीच्या काळातील खेळाडूंच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परीषद यांच्या वतीने प्रत्येक तालुक्यात एक उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन १ मे या महाराष्ट्र दिनाच्या शुभ मुहूर्तावर करण्यात येणार आहे. प्रशिक्षण शिबिरामध्ये ६ ते १४ वयोगटातील खेळाडूंना प्रवेश दिला जाणार असून देशी व विदेशी अशा जवळपास १५ ते २० खेळांचे शिबिर जिल्ह्यातील विविध केंद्रावर आयोजित केले जाणार आहेत. सदर शिबिराचे आयोजन हे जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा परीषदेचे अध्यक्ष डॉ.माणिक गुरसळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले जाणार असून सदर शिबिरामधून प्रशिक्षण घेणा-या खेळाडूंमधून जे सर्वात्कृष्ट खेळाडू निवडले जातील अशा खेळाडूंसाठी लवकरच पालघर जिल्ह्यासाठी विकसित होणाऱ्या जिल्हा क्रीडा संकूलाच्या भव्य अशा संकूलामध्ये तज्ञ प्रशिक्षकांकडून अद्यावत प्रशिक्षण तसेच क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न जिल्हा क्रीडा संकूल समिती व जिल्हा क्रीडा परीषदेमार्फत केला जाणार आहे. तरी याचा लाभ जास्तीत जास्त खेळाडूंना घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, पालघर यांनी केले आहे. संपर्कासाठी : ७८७५३२६३२६ (सुहास व्हनमाने, जिल्हा क्रीडा अधिकारी) व ८३६९६४३५०२ (प्रकाश वाघ, क्रीडा अधिकारी) यांच्याशी संपर्क साधावा. तालुका निहाय प्रशिक्षण शिबिरासाठी तालुका क्रीडा केंद्र प्रमुखांचे संपर्क क्रमांक : पालघर केंद्र ९२७१५५८४८५ राम पाटील, वसई केंद्र ९८२२८५१४२६ योगेश चौधरी, ९८२२२६३१७७ योगेश चौधरी, वाडा केंद्र ९०११५४७७९८ संदेश पाटील, ९३२५०४४७५६ राकेश ठाकरे, ९२०९२१९८७८. विक्रमगड केंद्र ९२०९५३५४३४ अरविंद ठाकरे, तलासरी केंद्र ९८९००३२४९१ पिंपळे, डहाणू केंद्र ७७९८३२३३०५ योगेश शिरसाट.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, जव्हार, जि. पालघर**

**ऑफ लाईन निविदा सूचना क्रमांक -04 सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील (ऑफलाईन) सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील पालघर जिल्ह्यातील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंतांकडून मागवित आहेत. कोरे निविदा नमुन्याची विक्री कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार येथे खालील दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत करण्यात येईल. कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, जव्हार हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सुचनेमध्ये एकूण ०५ (पाच) कामे समाविष्ट आहेत. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जव्हार यांचे कार्यालयातील सुचना फलकावर सदरची निविदा पाहावयास मिळेल.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत रुपये लक्ष जी.एस.टी. वगळून | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा संचाची किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | भुरीटेक मस्नेवाडी ते मेनरोड पेव्हर ब्लॉक बसविणे. ता. जव्हार, जि. पालघर | ८,५५,३८९/- | १०० दिवस | रु. ५००/- +१८% जीएसटी - रु. ९०/- एकूण ५९०/- | |
| २. | भुरीटेक मस्नेवाडी येथे मागासवर्गीय वस्ती येथे दिनेश बल्लाळ घर ते बबन वाघ यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे. ता. जव्हार, जि. पालघर | ८,५५,३८९/- | १०० दिवस | रु. ५००/- +१८% जीएसटी - रु. ९०/- एकूण ५९०/- | |
| ३. | भुरीटेक मस्नेवाडी ते स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. ता. जव्हार, जि. पालघर | ८,४९,२८९/- | १०० दिवस | रु. ५००/- +१८% जीएसटी - रु. ९०/- एकूण ५९०/- | |
| ४. | भुरीटेक मस्नेवाडी ते मेनरोडला जाणाऱ्या रस्त्यावर मोरी बांधणे. ता. जव्हार, जि. पालघर | ८,५९,२८२/- | १०० दिवस | रु. ५००/- +१८% जीएसटी - रु. ९०/- एकूण ५९०/- | |
| ५. | भुरीटेक मस्नेवाडी ते पाथर्डीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत संरक्षक भिंत बांधणे. ता. जव्हार, जि. पालघर | ८,६६,२१३/- | १०० दिवस | रु. ५००/- +१८% जीएसटी - रु. ९०/- एकूण ५९०/- | |

निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २९/०४/२०२२ ते दिनांक १३/०५/२०२२
निविदा स्विकृतीचा : दिनांक १७/०५/२०२२ (दुपारी १४.०० वा. पर्यंत)
निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १८/०५/२०२२ (११.०० वा. शक्य झाल्यास)

**टिप :**

१) ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म मागणी अर्जा सोबत नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
२) कोणतेही एक अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करणार यांनी राखून ठेवला आहे.
३) ठेकेदाराने कोरे निविदा नमुने पोष्टाने मागविल्यास ठेकेदारांच्या जबाबदारीवर पाठविलं जाईल. त्यास विलंब झालेस खाते जबाबदार राहणार नाही. त्यासाठी रु. २००/- जादा आकार पडेल.

**जा.क्र. सा.बां.वि./जव्हार/निविदा/१९८४**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार
जिल्हा-पालघर, पिन कोड - ४०१ ६०३
फोन नं. : ०२५०-२२२२३६
दिनांक : १९/०४/२०२२

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार**
**ता. जव्हार, जि. पालघर**

**जिमाका/पालघर/जाहि ६/२२१/२०२२ दिनांक : २६/०४/२०२२**

02 TO 08 MAY 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 30/04/2022 8:38 PM Page 1








# जीवनात आनंद मिळेल असे काम करा -जिल्हाधिकारी

**लातूर/प्रतिनिधी**



जिवनभर जे काम करायचे आहे. त्यात आनंद नसेल तर असे काम पुढे नेणे खूप कठीण होते. त्यामुळे ज्या कामात तुम्हाला आनंद मिळेल अशा कामाची निवड करुन ते करावे, असे प्रतिपादन लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी केले. येथील माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयातील 'एम.बी.बी.एस. स्पंदन २०१६' या बॅचचा पदवी प्रदान सोहळा मंगळवार, दि. २६ एप्रिल रोजी पडिले लॉन्स येथे संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक तथा नेत्र तज्ज्ञ डॉ. हनुमंत कराड हे होते. यावेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा शल्यचिकित्सक डॉ. ज्ञानेश्वर चिंते, बालरोग तज्ज्ञ डॉ. अशोक आरदवाड, प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने, मेंदू शल्यचिकित्सक डॉ. हनुमंत किनिकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मी बारावी सायन्स पीसीएमबी ग्रुप मधुन चांगले गुण घेऊन उत्तीर्ण झालो. यानंतर आयआयटी मधुन इंजिनियरिंगची पदवी मिळवली. पुढे एमएस साठी परदेशात प्रवेश मिळत होता. मात्र त्याचवेळी आयआयएम अहमदाबाद येथे एमबीए साठी प्रवेश मिळाला. एमबीए नंतर तीन वर्षे कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरी केली. दरम्यान शासकीय नोकरीसाठी प्रयत्न करावा असे वाटले म्हणून युपीएससीची तयारी केली आणि आयएएससाठी निवड झाली, असे सांगून यावेळी पुढे बोलताना जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. म्हणाले की, एमबीबीएस नंतर काही जनांचे एमडी, एमएस करण्याचे ठरले असेल तर काही जनांना आपल्या वडिलांचे हॉस्पीटल पुढे चालवायचे असेल तर काही जन पुढे काय करायचे म्हणून गोंधळलेले असतील. मात्र जीवनात सर्वच गोष्ठी ठरवून करता येत नाहीत. जीवन हे खुप गतीमान आहे. मी आयआयटी अथवा एमबीए करताना प्रशासकीय सेवेत जाण्याचे ठरवले नव्हते तर खाजगी क्षेत्रात नोकरी करण्याचे ठरवले होते. मात्र जीवन कुठे काय वळण घेणार हे माहित नसते. त्यासाठी आपण करीत असलेल्या कामात आनंद आणि समर्पणभाव असला पाहिजे. जर तुम्हाला वैद्यकीय क्षेत्रात रस वाटत नसेल तर तुम्ही तुमच्या आवडीचे दुसरे क्षेत्र निवडू शकता. जे कोणते काम आपण करु त्याबद्द्ल वचनबध्दता, अखंडता आणि नैतिकता असावी तरच आपले काम समर्पण होईल. त्यासाठी तुम्ही ...पान ६ वर

# शंकर शृंगारे यांना प्रधानमंत्री आत्मनिर्भर अभियान संघटनेचा पुरस्कार



**लातुर/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आत्मनिर्भर भारत अभियान या संघटनेने स्टैच्यू ऑफ नॉलेज उपक्रमाची दखल घेत राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार देऊन शंकर शृंगारे यांचा नुकताच सन्मान केला आहे. या कार्यक्रमाला जफर इस्लाम-(खासदार, राज्यसभा), सी.पी.सिंह, (आमदार-रांची), ब्रजमोहन राम (माजी खासदार-पलामू), शैलेंद्र महंतो (माजी खासदार, जमशेदपूर), रमेश रतन (चेअरमन-पीएसी कमिटी रेल्वे), प्रधानमंत्री आत्मनिर्भर भारत अभियान संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मुकेश शर्मा, राष्ट्रीय कार्याध्यक्ष राम कुमार पाल, प्रेम कुमार जी. आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

कोविड महामारीच्या काळात जवळपास ५० हजार कुटुंबांना शंकर शृंगारे यांनी घरपोच अन्नधान्याचे किट पोहनचवले होते. कोविडवर उपचारासाठी शेकडो लोकांना औषधांचा पुरवठाही करण्यात आला होता, याची दखल देखील आत्मनिर्भर अभियान संघटनेने घेतली आहे. स्टयाचू ऑफ नॉलेज च्या निमित्ताने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारे हजारो लोक लातुरच्या आंबेडकर पार्कवर एकत्र आले होते. बाबासाहेबांची ७२ फुटांची ही प्रतिकृती सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी एकतेचे प्रतीक ठरली आहे. याचीच दखल घेत प्रधानमंत्री आत्मनिर्भर भारत अभियान संघटनेने शंकर शृंगारे यांचा पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. याबद्दल शंकर शृंगारे यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# मेडिक्वीन मिसेस महाराष्ट्र स्पर्धेत लातूरच्या वर्षा महिंद्रकर यांचे यश



**लातूर/प्रतिनिधी**

पुणे येथील हॉटेल ऑर्थिड येथे पार पडलेल्या विवाहित डॉक्टर महिलांसाठी आयेजित करण्यात आलेल्या आशिया खंडातील पहिल्या मेडिको पेजंट मध्ये लातूरच्या डॉ. वर्षा महिंद्रकर या मिसेस पॅशिनेट ठरल्या, या स्पर्धेत महाराष्ट्रातुन २०० पेक्षा अधिक महिला डॉक्टरांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी ५३ महिला स्पर्धक अंतिम फेरीत पात्र ठरल्या त्यात लातुरच्या डॉ वर्षा महिंद्रकर होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. प्रेरणा बेरी सेक्रेटरी, डॉ. प्राजक्ता शहा व कोरीओग्राफर म्हणुन योगेश पवार यांनी यशस्वीरित्या जबाबदारी पार पाडली. या प्रसंगी प्रसिध्द अभिनेते समीर धर्माधिकारी, सुशांत शेलार, तेजपाल वाघ, गायक उत्कर्ष शिंदे, अभिनेत्री पुजा सावंत हे प्रमुख पाहुने म्हणुन उपस्थित होते. डॉ. वर्षा महिंद्रकर यांनी या स्पर्धेत यश संपादन करून डॉक्टर म्हणजे फक्त अभ्यासु व्यक्ती नसुन ती सर्वगुणसंपन्न असु शकते हे दाखवून दिले. डॉ. वर्षा महिंद्रकर यांनी त्यांच्या यशाचे संपुर्ण श्रेय हे त्यांचे पति डॉ. सुनिल महिंद्रकर यांना दिले आहे. पतीची सहमती, प्रोत्साहन मुलांची साथ व परिवारातील सर्व सदस्यांचे शुभाशिर्वाद या सर्व गोष्टींमुळेच हे यश गाठु शकले असे त्या म्हणाल्या. जर एखाद्या स्त्रीला घरातून पुर्ण पाठिंबा असेल तर ती कोणतीही अशक्य गोष्ट ही शक्य करुन दाखवू शकते हे त्यांनी दाखवुन दिले. त्यांच्या या यशाबददल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पोलिसांची परवानगी घेऊनच धार्मिक स्थळावर भोंगे लावण्याबाबत लातूर पोलिसांचे आवाहन



**लातूर/प्रतिनिधी**

पोलीस ठाणे गांधी चौक येथे गांधी चौक पोलीस स्टेशनच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सदर इफ्तार पार्टीस पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन, परिविक्षाधीन जिल्हाअधिकारी जतिन रहमान, महानगरपालिकेचे आयुक्त अमन मित्तल, मुख्याधिकारी अभिनव गोयल, उपविभागीय पोलिस अधिकारी लातूर शहर जितेंद्र जगदाळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे पोलीस ठाणे गांधी चौकचे पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकुडे, संजीवन मिरकले हे उपस्थित होते. तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्या सुरू असलेल्या भोंगा, स्पीकर वादाच्या अनुषंगाने पोलिस अधीक्षकांनी नागरिकांना खालील प्रमाणे सूचना व मार्गदर्शन केले आहेत. कायद्याच्या तरतुदी मध्ये काही गोष्टीला बंधन आहेत तर काही गोष्टींवर बंधन नाहीत त्यासाठी परवानगी लागते, ही परवानगी असेल तर आपण समर्थपणे प्रत्येक गोष्टीचा आनंद घेऊ शकतो. सध्या भोंगा या विषयावरून काही ठिकाणी वाद निर्माण होतोय तर काही लोक आक्षेप नोंदवत आहेत. काही लोकांना त्याबद्दल शंका आहे. कायद्यातील तरतुदीचा सर्वांनी अभ्यास केला तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते सुप्रीम कोर्टाच्या निर्णया प्रमाणे स्पीकर वापरण्यावर बंदी नसून स्पीकर भोंगा च्या आवाजाची मर्यादा किती असावी याच्या वरती आहे. आणि त्यासाठी अधिकृत प्रशासनाकडून ...पान ६ वर

# गंगापुर सोसायटीवर खंदाडे पॅनल विजयी

## ३५ वर्षांची सत्ता अबाधित, काँग्रेसचा पुन्हा पराभव

**लातूर/करकरे आंबादास**



गंगापुर गावामधील विविध विशाल कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची निवडणूक काल पार पडली. या निवडणूकीत भाजपचे बाबु हणमंतराव खंदाडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी विकास पॅनल उभे होते. काँग्रेस कडुन माजी जिल्हापरिषद अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे गुरुजी, माजी जिल्हापरिषद सदस्य डॉ. सतीश कानडे, माजी पंचायत समिती सभापती व पंचायत समिती सदस्य तानाजी फुटाणे यांच्या नेतृत्वाखाली गंगादेवी ग्रामविकास पॅनल उभे होते. या चुरशीच्या निवडणूकीत बाबु हणमंतराव खंदाडे यांचे शेतकरी विकास पॅनल विजयी झाले. लातुर जिल्हा बँक निवडणुक प्रकरण लक्षात घेऊन काँग्रेसच्या दिग्गज लोकांनी प्रयत्न केले. स्वतः सहकार महर्षी व पालकमंत्री यांच्याकडुन निवडणूकीत लक्ष घातले गेले तरी सुध्दा भाजपचे नेते बाबु हणमंतराव खंदाडे यांच्या नेतृत्वाखाली पॅनल बहुमताने विजयी झाले. विशेष म्हणजे भाजपचे माजी शहर अध्यक्ष शैलेश लाहोटी यांचे समर्थक असलेले भाजपचे मंडल अध्यक्ष ही काँग्रेसच्या पॅनलच्या मदतीला होते. या निवडणुकीत बाबु हणमंतराव खंदाडे, नारायण व्यंकटराव शिंदे, सतीश श्रीहरी धोत्रे, सुग्रीव भागुराम वाघे, जर्नाधन काशिनाथ फुटाणे, मधुकर लक्ष्मण सुर्यवंशी, शेषेराव अनंतराव दंडीमे, माजीद महम्मद शेख, दगडु इब्राहिम शेख, राम हरीबा बनसोडे, शितलताई अमरदिप शिंदे, राजश्री प्रतापराव शिंदे, नागरबाई शेषराव राऊत आदि १३ जण १५० पेक्षा जास्त मताधिक्य घेऊन निवडुण आले. पुर्ण पॅनलला बहुमत मिळाले. मागील ३५ वर्षापासून गंगापुर संस्था ही भारतीय जनता पक्षाचे हणमंतराव खंदाडे यांच्या ताब्यात आहे. लातुर जिल्हा सहकारी बँक निवडणूकीत बाबु हणमंतराव खंदाडे यांनी लक्ष घातल्यामुळे त्या निवडणूकीचे ...पान ६ वर


